LIVE पार्श्वभूमी बीड पोर्टलसाठी
तालुका, शहर व गावनिहाय प्रतिनिधी नेमणे आहे
संपर्क : दै.पार्श्वभूमी कार्यालय, भाजी मंडई, बीड.
संपादक गंमत भंडारी 9422295333 8623880100

# पार्श्वभूमी

रियांश एन्टरप्राईजेस
नामांकित कंपनीचे LED टी.व्ही.
50% पर्यंतच्या सवलती दरात मिळतील
पत्ता : शॉप नं.92 व 93 सारडा सेंट्रल, डी.पी.रोड,बीड.
Mob.9511511818

बीड वर्ष ३६ वे अंक ११३ वा फोन २३०१०१ दिनांक २३ मार्च २०२६ सोमवार | गंमत भंडारी | ई-पेपर : www.parshvbhumi.com | Reg.No.L/85/RNP/Beed/2020-22 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 | पाने ६ किंमत ४रु.

# वासनांध भोंदू अशोक खरातला अंग सुजूस्तर बदडलं
# खरातनं २० फुटाचा नाग वशीकरणासाठी पाळला होता

बीड दि.२२ (प्रतिनिधी):– पोलिसांनी मनावर घेतलं तर काहीही होऊ शकतं. कायद्याचं राज्य काय असतं हे खरात प्रकररात आता अनुभवयाला मिळत आहे. महिलांवर लैंगिक अत्याचार करणारा भोंदूबाबा अशोक खरातला नाशिक पोलिसांनी अटक केल्यानंतर त्याला धू धू धुतला, अंग सुजूस्तर बदडला, चालताही येत नव्हतं, पोलीस म्हणायला लावत होते ''नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला'' हे वाक्य सुद्धा त्याला बोलता येत नव्हतं, इतका गलितगात्र खरात झाला. आता जेलमध्ये पोपटासारखा बोलतं, जसजसे एक एक प्रकरण पुढे येत आहेत तशी नवी माहिती समोर येत आहे. आपल्या दरबारात आलेल्या मोठ्या राजकारणी, उद्योगपती, अधिकारी यांना वश करण्यासाठी खरातने २० फुटाचा नाग पाळला होता ( जो नाग नकली होता, मात्र त्याला नागाची कातन लावून त्यामध्ये एक ड्रोन बसविलेला होता त्याचा रिमोट खरातच्या हाती असायचा, तो रिमोटचे बटन दाबायचा तसा तो नाग फणा काढायचा, डोलायचा) लोक थक्क व्हायचे आणि नाग निघून जायचा. लोकांना वाटायतं हा नागाला सुद्धा वश करु शकतो, तर बाकी सर्व गोष्टी त्याच्यासाठी काहीच नाहीत, आणि लोक त्याच्या भोंदूगिरीच्या जाळ्यात अडकायचे.



नाशिकचा भोंदू अशोक खरातला पोलिसांनी महिलांवर केलेल्या अत्याचार आणि भोंदूगिरी प्रकरणात अटक केली असून त्याला अटक झाल्यानंतर हळुहळू लोक बोलू लागले आहेत. सुरुवातीला एका महिलेच्या तक्रारीवरुन खरातला पोलिसांनी उचलले, मात्र शनिवारी आणि रविवारी पुन्हा दोन महिलांनी तक्रारी दिल्या. खरात बाजारातून नकली प्लॅस्टीकचे खडे आणायचा आणि त्याची हजारो रुपये किंमत सांगून तो भक्तांकडून पैसे उकळायचा. आपल्या दरबारात आलेल्या भक्तांना वश करण्यासाठी आणि जाळ्यात अडकविण्यासाठी त्याने नामी युक्ती शोधली होती. तो साधना करत बसायचा, साधना करत असतांना तो नागराजाला आव्हान करायचा आणि काही क्षणातच भला मोठा २० फुटाचा नाग डोलत डोलत त्याच्यासमोर यायचा, फणा काढून त्याच्यासमोर हलवायचा, खरातच्या हातात या नकली नागाचा रिमोट कंट्रोल असल्यामुळे तो पाहिजे तसा त्याला डोलवत बसायचा. समोर असलेले भक्त थक्क होऊन जायचे आणि वेड्यासारखे त्याच्या भोंदुगिरीच्या जाळ्यात अडकायचे. केवळ महिलांचे लैंगिक शोषणच नाही तर या खरातने कोट्यावधी रुपयांची प्रॉपर्टी जमा केली. ही बेहिशोबी मालमत्ता नाशिकसह मोठ्या शहरात असल्याचे बोलले जाते. नाशिकमध्ये अनेकांची फसवणूक करत त्याने शेत जमिनी बळकावल्या. आपल्या विकत घेतलेल्या शेत जमिनीवर तो अमावस्येला आणि पौर्णिमेला जाऊन तो काहीतरी करायचा असे ग्रामस्थ सांगतात. अनेक लोकांना सौदा करुन, कमी पैसे देऊन त्याने जमिनी हडप केल्या. आयकर विभागाने याची स्वतंत्र चौकशी सुरु केली आहे. ज्या मंदिराचा तो अध्यक्ष होता त्या ट्रस्टची सुद्धा चौकशी सुरु झाली आहे. खरातच्या दरबारात मंत्री, आमदार, खासदार, मोठे अधिकारी, पोलीस खात्यातील बडे प्रस्थ असणारे अधिकारी यायचे त्यामुळे त्याला कशाचीच भीती वाटली नाही. आपल्या बाबतीत भविष्यात असे काही होईल याची सुतरामही कल्पना खरातला नव्हती. एवढे सगळे लोक आपल्या दिमतीला असतांना आपले कोणी काही बिघडवू शकत नाही म्हणून त्याचे धाडस वाढले आणि तो काहीही करु लागला. छोट्या मोठ्या तक्रारी आणि कुजबूज असायची, परंतु सरकारी यंत्रणा त्याच्या दिमतीला असल्याने आजपर्यंत त्याची दखल घेतली गेली नाही. आता सर्व बाहेर येऊ लागलं आहे. अनेक महिलांचे लैंगिक शोषण त्यांनी केले असल्याचे उघडक होत आहे. लग्न जमावं, लग्न टीकावं, मूल व्हावं, घरातील इतर समस्या अशा नाजूक प्रश्नात तो महिलांना ब्लॅकमेल करायचा. एखादी महिला प्रतिकार करु लागली तर तुझ्या नवऱ्याचा मृत्यू होईल अशी भीती तो घालायचा, त्यामुळे त्याच्या विरुद्ध आवाज उठवायला कोणी पुढे येत नव्हते. एका महिलेने दिलेल्या तक्रारीत पान २ वर

## रमेश निकाळजेंवर वाळू माफीयांचा हल्ला



बीड दि.२२ (प्रतिनिधी):- घरासमोर स्वत:चे लहान लहान मुले खेळतात, त्यामुळे तुमचे वाळूचे मोठे मोठे वाहने सावकाश चालवा, माझ्या मुलांना धक्का लागेल निकाळजे म्हणाले असता तू आम्हाला विचारणारा कोण? म्हणत वाळू माफियांनी धारदार शस्त्राने रमेश निकाळजे यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. यामध्ये निकाळजे हे गंभीर जखमी झाले असून त्यांच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत. सदरील घटनेची माहिती किसन तांगडे यांना नातेवाईकांनी दिल्या नंतर त्यांच्यासह सहकाऱ्यांनी घटनेचे गांभीर्य ओळखून पान २ वर

### महाराष्ट्र शासनाचा निर्णय
## रॉकेल पुन्हा बाजारात

बीड दि.२२ (प्रतिनिधी):- १५ वर्षांपासून बंद करण्यातआलेला रॉकेलचा पुरवठा पुन्हा राज्य शासनाकडून सुरू करण्याबाबतच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण होऊ शकणाऱ्या इंधन टंचाईचा विचार करून सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत स्वयंपाक व दिवाबत्तीसाठी रॉकेलचे तात्पुरते वितरण करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. याबाबत सर्व जिल्हाधिकाऱ्यांना शासनाकडून सविस्तर सूचना जारी करण्यात आल्या आहेत. बीड प्रशासनालाही या सूचना आल्याने बीडचा पुरवठा विभाग जिल्हाभरातील ग्रामीण भागातल्या राशन दुकानांसह ज्यांच्याकडे रॉकेलचे लायसेन्स होते त्यांचा शोध घेत शासनस्तरावर माहिती पुरवत असल्याचे सांगितले जाते.
बीड जिल्हा प्रशासनाला २० मार्च रोजी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागामार्फत पत्र आले आहे. सदरच्या पत्रावर तात्काळ या शब्दाचा प्रयोग करण्यात आलेला आहे. पान २ वर

### परळी तालुक्यातील संतापजनक घटना
## ५० वर्षाच्या नराधमाचा अल्पवयीन मुलीवर अत्याचार

**बीड दि.२२ (प्रतिनिधी):– बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील एका गावात धक्कादायक घटना घडली आहे. ५० वर्षाच्या नराधमाने अल्पवयीन मुलीवर दोन वेळा अत्याचार केल्याची घटना घडली आहे. दोन वेळा दुकानात बोलावून अत्याचार केल्याचे समोर आले आहे. या घटनेनंतर परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



**पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल**

बीड जिल्ह्यातील परळी तालुक्यातील एका गावात अल्पवयीन मुलीसोबत एका ५० वर्षीय नराधमाने दोनवेळा अत्याचार केल्याची घटना समोर आल्याने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. पीडित मुलगी ही १० वर्षांची असून ती ५ वी वर्गात शिक्षण घेते. गावातील एका किराणा दुकानदाराने त्याच्या दुकानात बोलावून घेत तिच्यासोबत लैंगिक अत्याचार केला. इतकच नाही तर असाच प्रकार दोन महिन्यापूर्वी देखील करण्यात आला पान २ वर

## वकिलांना ३ महिने काळ्या कोटापासून मिळणार सुट्टी

पुणे दि.२२ (प्रतिनिधी):- वाढत्या उष्णतेमुळे वकिलांना मोठा दिलासा देणारा निर्णय घेण्यात आला आहे. उन्हाळ्याच्या काळात पारंपरिक काळा कोट घालण्यापासून वकिलांना तात्पुरती सूट देण्यात आली आहे.
१५ मार्च ते १५ जून या कालावधीत ही सवलत लागू राहणार असून या दरम्यान पान २ वर



बीड – रोटरी क्लब ऑफ बीडच्या वतीने माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांना आज चंपावती रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी रोटरी डिस्ट्रीक्ट गव्हर्नर सुधीर लातूरे, ग्लोबल विकास ट्रस्टचे मॅनेजिंग ट्रस्टी मयंक गांधी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी पत्रकार ओम मोतीपोवळे, हरीश मोटवानी, बीड रोटरीचे अध्यक्ष विकास उमापूरकर, सुमित जैस्वाल, सुरेश लड्डा,वाय जनार्दन राव, संतोष पवार या पदाधिकाऱ्यांसह शहरातील विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती.

### ओबीसी चळवळीचा बुलंद आवाज हरवला
## ऑल इंडिया मुस्लिम ओबीसी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अन्सारी यांचे निधन

बीड दि.२२ (प्रतिनिधी):- ऑल इंडिया ओबीसी मुस्लिम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी यांचे शनिवारी जालना येथे निधन झाले. ते ७९ वर्षांचे होते. त्यांच्या निधनामुळे ओबीसी चळवळीचा एक बुलंद आवाज हरवल्याची भावना व्यक्त होत आहे. त्यांच्या निधनावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री छगन भुजबळ यांच्यासह अनेकांनी शोक व्यक्त केला आहे. शब्बीर अहमद अन्सारी हे गत काही महिन्यांपासून आजारी होते. काल त्यांनी आपल्या कुटुंबीयांसोबत ईद साजरी केली. त्यानंतर शनिवारी दुपारी १२.३० वा. त्यांनी जालना येथील आपल्या राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्यावर शनिवारी रात्रीच उशिरा अंत्यसंस्कार करण्यात आले. शब्बीर अन्सारी यांनी सुरुवातीला मुस्लिम ओबीसी आरक्षणासाठी खंबीर पान २ वर



## हर्षवर्धन सदगीर महाराष्ट्र केसरी

पुणे दि.२२ (प्रतिनिधी):- पुण्यातील वाघोली, तालुका हवेली येथे महाराष्ट्र केसरीचा अंतिम सामना महेंद्र गायकवाड आणि हर्षवर्धन सदगीर यांच्यात पार पडला. हर्षवर्धन सदगीर याने महेंद्र गायकवाड याला ४-२ असे पराभूत केले. या विजयासह हर्षवर्धन सदगीर सातवा डबल महाराष्ट्र केसरी झाला. पान २ वर



### वृत्तपत्र विक्रेते सुदाम चव्हाण यांची कन्या
## डॉ.कल्याणीची सुपर स्पेशलिस्ट न्यूरोलॉजिस्ट शिक्षणासाठी निवड
### बीड जिल्ह्यातील न्यूरोलॉजिस्ट सुपर स्पेशलिस्ट पहिली महिला डॉक्टर कल्याणी चव्हाण



बीड दि.२२ (प्रतिनिधी):- २०२५ च्या डीएम सुपर स्पेशलिस्ट परीक्षेमध्ये ऑल इंडिया रँक मिळवणारी डॉक्टर कल्याणी चव्हाण मराठवाड्यातील पहिली महिला ठरली आहे. त्यातून गव्हर्न्मेंट सीट सुपर स्पेशलिस्ट न्यूरोलॉजिस्ट शिक्षणासाठी उत्तर प्रदेश मधील आग्रा येथे पान २ वर



# भोंदूबाबा अशोक खरातचा पाय आणखी खोलात

## तिसरा गुन्हा दाखल



नाशिक दि.२२ (वृत्तसेवा):- नाशिकमध्ये स्वयंघोषित ज्योतिषी म्हणून ओळखले जाणारे अशोक खरातच्या काळ्या कारनाम्यांचा साखळीप्रमाणे पर्दाफाश होत आहे. महिलांच्या लैंगिक शोषणाच्या प्रकरणात आधीच अटकेत असलेल्या खरातविरुद्ध आता तिसरा गुन्हा दाखल झाला आहे. नाशिकच्या सरकारवाडा पोलीस ठाण्यात एका पीडित महिलेच्या तक्रारीवरून हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पीडितेने दिलेल्या तक्रारीनुसार, अशोक खरातने तिला लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध प्रस्थापित केले. ही महिला सुरुवातीला लग्नापूर्वी त्याच्याकडे जात होती. नंतर तिचा विवाह झाल्यानंतर संसारातील वादांमुळे ती खरातकडे 'दोष निवारण' आणि मार्गदर्शनासाठी जात असे. खरातने तिच्या परिस्थितीचा गैरफायदा घेत तिच्यावर लैंगिक शोषण सुरू केले. विश्वास संपादन केल्यानंतर त्याने तिच्यासोबत वारंवार शारीरिक संबंध ठेवले, ज्यामुळे पीडिता गर्भवती राहिली.

गर्भवती असतानाही शोषण सुरूच

खरातने आपले पितळ उघडे पडू नये म्हणून गर्भवती पीडितेला गर्भपात करण्यासाठी औषध दिले होते. त्याने तिला २०२७ पर्यंत लग्न करण्याचे आश्वासन दिले होते. तो स्वतःला अवतारी पुरुष म्हणवत असे आणि पीडितेला ''तू मागील जन्माची अप्सरा आहेस, मला त्रिकाळ ज्ञान आहे, तुझा घटस्फोट लिखित आहे'' असे सांगून विश्वासात घेत असे. ''माझ्या नशिबात दोन विवाह आहेत, तू माझ्याशी लग्न कर, मी तुला आणि तुझ्या मुलांना चांगल्या प्रकारे सांभाळेन'' अशी आश्वासनेही दिली होती.

पोलिसांची कठोर कारवाई

या प्रकरणात अशोक खरातला पोलीस कोठडीत ठेवण्यात आले असून, नाशिक पोलिसांनी त्याला कठोर चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे. विशेष तपास पथक (डखढ) स्थापन करण्यात आले असून, खरातच्या फॉर्महाऊस, कार्यालय आणि मालमत्तेवर छापेमारी सुरू आहे. यापूर्वीच्या गुन्ह्यांमध्येही ५८ हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ जप्त झाले आहेत.

राजकीय आणि सामाजिक खळबळ

खरातच्या प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडाली आहे. अनेक राजकीय नेते, अधिकारी आणि सेलिब्रिटी त्याच्याकडे भविष्य जाणून घेण्यासाठी जात असल्याचे उघड झाले आहे. पोलिसांचा तपास अधिक गहन होत असून, आणखी पीडित महिला समोर येण्याची शक्यता आहे. अशा भोंदू बाबांच्या जाळ्यात अंधश्रद्धेने अडकलेल्या महिलांना न्याय मिळावा, यासाठी नाशिक पोलिसांची कारवाई राज्यभरात चर्चेत आहे. या घटनेमुळे अंधश्रद्धा, जादूटोणा आणि महिलांच्या शोषणाविरुद्ध कठोर कारवाईची मागणी जोर धरू लागली आहे.

# वर्गात मोबाईलला बंदी!

## जगातील निम्म्याहून अधिक देशांनी घेतला मोठा निर्णय

जगभरातील शाळांमध्ये मोबाईल फोनच्या वापरावर बंदी घालण्याचा कल झपाट्याने वाढत असल्याचे UNESCO च्या अहवालातून समोर आले आहे. विद्यार्थ्यांचे लक्ष विचलित होणे, सायबरबुलिंग आणि मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम या कारणांमुळे अनेक देशांनी कठोर निर्णय घेतला आहे.

निम्म्याहून अधिक देशांमध्ये बंदी

UNESCO च्या ग्लोबल एज्युकेशन मॉनिटरिंग टीमच्या अहवालानुसार, जगातील तब्बल ११४ शिक्षण प्रणालींमध्ये शाळांमध्ये मोबाईल वापरावर बंदी घालण्यात आली आहे. हा आकडा सुमारे ५८ टक्के देशांपर्यंत पोहोचला आहे. २०२३ मध्ये केवळ २४ टक्के देशांमध्ये अशी बंदी होती, तर २०२५ मध्ये ती ४० टक्क्यांवर गेली आणि मार्च २०२६ पर्यंत यात मोठी वाढ झाली आहे.

सायबरबुलिंग आणि मानसिक आरोग्याची चिंता

अहवालात सोशल मीडियामुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर होणाऱ्या परिणामांबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली आहे. विशेषतः मुलींवर याचा अधिक परिणाम होत असून, त्या मुलांच्या तुलनेत दुप्पट प्रमाणात खाण्याच्या विकारांना बळी पडत आहेत. फेसबुकच्या संशोधनानुसार, इंस्टाग्राम वापरल्यानंतर ३२ टक्के किशोरवयीन मुलींना स्वतःच्या शरीराविषयी नकारात्मक भावना निर्माण होतात. TikTok वर प्रत्येक ३९ सेकंदांनी शरीराच्या प्रतिमेशी संबंधित कंटेंट दाखवला जातो, तर दर ८ मिनिटांनी खाण्याच्या विकारांशी संबंधित सामग्री पुढे येते.

लहान वयात वाढणारा परिणाम



अहवालानुसार, वयाच्या १० व्या वर्षापासून सोशल मीडियाचा जास्त वापर केल्यास मुलांच्या भावनिक आणि सामाजिक विकासावर नकारात्मक परिणाम दिसून येतो. हा प्रभाव विशेषतः मुलींमध्ये अधिक आढळतो.

धोरणांमध्ये विविधता

अनेक देशांनी शाळेच्या वेळेत किंवा वर्गात मोबाईल वापरावर पूर्ण बंदी घातली आहे. काही ठिकाणी केवळ शैक्षणिक कारणांसाठी मोबाईल वापरास परवानगी दिली जाते. तसेच आजार किंवा अपंगत्व असलेल्या विद्यार्थ्यांसाठी विशेष सवलतीही दिल्या जातात. काही देशांनी शाळांना स्वतःचे नियम बनवण्याची मुभा दिली आहे.

काही देशांचा वेगळा दृष्टिकोन

काही देशांनी संपूर्ण बंदी न घालता मोबाईल वापरावर मर्यादा आणण्याचा मार्ग स्वीकारला आहे. स्थानिक किंवा प्रादेशिक स्तरावर नियम बनवून शाळांना स्वायत्तता देण्याची पद्धतही काही ठिकाणी पाहायला मिळते. अमेरिकेत राष्ट्रीय स्तरावर बंदी नसली, तरी ३९ राज्यांमध्ये मोबाईल वापरावर निर्बंध लागू करण्यात आले आहेत.

फ्रान्ससह नव्या देशांचा सहभाग

फ्रान्सने प्राथमिक आणि माध्यमिक शाळांमध्ये मोबाईल वापरावर आधीच बंदी लागू केली असून, आता अधिक कडक नियमांवर चर्चा सुरू आहे. तसेच बोलिव्हिया, कोस्टा रिका, क्रोएशिया, जॉर्जिया, मालदीव आणि माल्टा यांसारख्या देशांनीही अलीकडेच या यादीत प्रवेश केला आहे.

सोशल मीडियावरही निर्बंधांची चर्चा

काही देश मुलांसाठी सोशल मीडियाच्या वापरावरही निर्बंध आणण्याचा विचार करत आहेत. ऑस्ट्रेलिया, फ्रान्स, पोर्तुगाल आणि स्पेनमध्ये याबाबत प्रस्ताव पुढे येत आहेत, तर डेन्मार्क, झेक प्रजासत्ताक आणि इंडोनेशिया येथे चर्चा सुरू आहे.

पान १ वरून

### रॉकेल पुन्हा बाजारात

त्यामध्ये म्हटले आहे. सध्याच्या युद्धजन्य परिस्थितीचा विचार करून उद्भवलेल्या संभाव्य जोखमीचे निराकरण करण्यासाठी स्वयंपाक व दिवाबत्तीसाठी सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत केरोसीनचे तात्पुरते वाटप करण्याचा निर्णय केंद्र शासनाने १२ मार्च रोजी घेतल्याचे सांगण्यात आले आहे. त्यानुसार राज्यभरातल्या जिल्हाधिकाऱ्यांना पत्राद्वारे केरोसीन वितरणाची यंत्रणा पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करण्यात आल्याचे म्हटले आहे.

शासन निर्णयानुसार राज्यात केरोसीन वितरण अत्यंत मर्यादीतस्वरुपात असल्याने लाभार्थ्यांना वितरण करताना अडचणी निर्माण होऊ शकतात त्यामुळे केरोसीन परवान्याचे नूतनीकरण, मंजुरी, वारसाच्या नावे वर्गीकरण प्रक्रिया सोपी करण्याचे निर्देश दिले आहेत. पुढील महिन्यापासून ग्रामीण भागात रॉकेल मिळणार असल्याचे या आदेशातून स्पष्टपणे जाणवते.

### भोंदूबाबा खरातला अंग सुजूस्तर बदडलं...

तर २०२२ ते २०२५ पर्यंत त्याने अनेकवेळा ऑफीसमध्ये बोलावून लैंगिक अत्याचार केल्याच्या तक्रारी आहेत. खरातला पकडून पोलिसांनी कोठडीतु टाकलं, धू धू धुतला, सुजूस्तर बदडला. आता एक एक प्रकरणं आणि फाईली बाहेर येऊ लागल्या आहेत. खरातला कोठडीतून काढून बाहेर चौकशीसाठी चालवत नेत असल्याचा एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे, ज्यात त्याला चालताही येत नाही, अर्धमेली अवस्था झाली आहे. पोलीस त्याला सांगत आहेत म्हण ''नाशिक जिल्हा कायद्याचा बालेकिल्ला'' त्याला हे शब्दही नीट बोलता येत नव्हता, इतका त्याचा पाहुणचार पोलिसांनी कोठडीत घेतला आहे.

### अल्पवयीन मुलीवर अत्याचार...

आणि त्या नंतर त्या नराधमाने अल्पवयीन मुलीला जीवे मारण्याची धमकी दिली. याच कारणामुळे या नराधमाने पुन्हा दोन महिन्यानंतर पीडितेवर अत्याचार केला आहे. यानंतर परळी येथील ग्रामीण पोलीस ठाण्यात आरोपी बालाजी पांचाळ याच्या विरोधात परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात पोस्को अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परिसरातील नागरिकांनी नराधमाला ताब्यात घेत पोलिसांच्या हवाली केले. या प्रकरणाचा अधिक तपास पोलीस करत आहेत.

### रमेश निकाळजेंवर हल्ला

लागलीच निकाळजे यांची भेट घेऊन त्यांची आस्थेवाईकपणे चौकशी करून त्याला धीर दिला.खोलवर जखमा आणि खूप रक्तस्त्राव झाल्याने योग्य उपचारा विषयी बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा चिकित्सक डॉ.सतीश सोळुंके यांच्या सोबत किसन तांगडे यांनी चर्चा केली.

त्यानंतर या गंभीर घटने विषयी गेवराईचे पोलीस उपअधीक्षक अनिल कटके , चकलंबा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सचिन इंगळे यांच्या सोबत सविस्तर चर्चा करून आरोपीवर कठोरात कठोर कारवाई करून त्यांना ताबडतोब अटक करण्याविषयी मागणी केली. त्वरित कारवाई न झाल्यास युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्हाभर तीव्र आंदोलन छेडले जाईल असा इशारा किसन तांगडे यांनी दिला. यावेळी तांगडे यांच्या सोबत राहुल कांबळे,रामेश्वर खळगे,बंडू ठोंबरे,गणेश प्रधान,संदेश मस्के,विजय तांगडे,दिपक जावळे,अशोक निकाळजे सह अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

### शब्बीर अन्सारी यांचे निधन...

लढा दिला. त्यांनी ओबीसी आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला. आपले उभे आयुष्य ओबीसींच्या न्याय हक्कासाठी समर्पित केले. त्यांनी नुकत्याच झालेल्या ओबीसी आरक्षण बचाव आंदोलनातही सहभाग घेतला होता. राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री तथा बडे ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी शब्बीर अन्सारी यांच्या निधनावर शोक व्यक्त केला आहे. ते म्हणाले, अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस आणि ऑल इंडिया ओबीसी मुस्लिम संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शब्बीर अहमद अन्सारी यांच्या निधनाचे वृत्त मनाला चटका लावणारे आहे. त्यांच्या जाण्याने ओबीसी चळवळीचा बुलंद आवाज आणि लढवय्या नेता गमावला आहे. शब्बीर अन्सारी केवळ माझे सहकारी नव्हते, तर ओबीसी चळवळीतील माझे अत्यंत विश्वासू आणि खंदे सोबती होते. मंडल आयोगाच्या शिफारशी लागू करण्यासाठी आणि बहुजन समाजाला न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही गेली अनेक दशके खांद्याला खांदा लावून संघर्ष केला आहे.

शब्बीरभाई यांनी जात आणि वर्ग यातील फरक अचूक ओळखून मुस्लिम समाजासाठी आरक्षणाची जी कायदेशीर आणि सामाजिक मोहीम हाती घेतली होती, ती यशस्वी करून दाखवली. मुस्लिम ओबीसी समाजाला आरक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी दिलेले योगदान ऐतिहासिक स्वरूपाचे आहे. 'मंडलनामा' या त्यांच्या ग्रंथामधून त्यांनी स्वतःचा आणि मुस्लिम ओबीसी संघटनेचा जो खडतर प्रवास मांडला आहे, तो सामाजिक चळवळीचा एक महत्त्वाचा दस्तऐवज असून, येणाऱ्या पिढ्यांना आपल्या हक्कासाठी सदैव प्रेरणा देत राहील. या ग्रंथाच्या मराठी आवृत्तीचे प्रकाशन माझ्या हस्ते झाले होते, ही माझ्यासाठी नेहमीच स्मरणात राहणारी बाब आहे. अन्सारी साहेबांनी मांडलेली भूमिका आणि त्यांनी दिलेला लढा हा केवळ मुस्लिमांसाठी नसून तो संपूर्ण वंचित घटकांसाठी होता. स्व. विलासराव देशमुख, शरद पवार साहेब यांच्यापासून ते युती सरकारच्या मुख्यमंत्र्यांपर्यंत सर्वांना सोबत घेऊन त्यांनी ओबीसींच्या प्रश्नांवर मार्ग काढला. त्यांच्या जाण्याने समता परिषदेची आणि माझी वैयक्तिक मोठी हानी झाली आहे. एक सच्चा आणि लढवय्या नेता आज आपल्यातून निघून गेला आहे. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. अन्सारी परिवाराच्या या दुःखात आम्ही सर्वजण सहभागी आहोत, असे भुजबळांनी म्हटले आहे.

### वकिलांना ३ महिने काळ्या कोटापासून सुट्टी

वकिलांना न्यायालयात काम करताना काळा कोट परिधान करणे बंधनकारक राहणार नाही.

उन्हाळ्यात तापमानात मोठी वाढ होत असल्याने काळ्या रंगाच्या कोटामुळे उष्णता अधिक जाणवते. त्यामुळे वकिलांना दीर्घकाळ न्यायालयात काम करताना त्रास सहन करावा लागतो. विशेषतः ज्या न्यायालयांमध्ये पुरेशा थंडाव्याच्या सुविधा उपलब्ध नाहीत, त्या ठिकाणी परिस्थिती अधिक कठीण होते. ग्रामीण भागातील अनेक न्यायालयांमध्ये पंखे, कुलर किंवा एअर कँडिशनिंगची सुविधा मर्यादित असल्याने वकिलांना उकाड्यात काम करणे आव्हानात्मक ठरते. या पार्श्वभूमीवर ही सवलत उपयुक्त ठरणार असल्याचे मानले जात आहे. काळा कोट हा वकिलांच्या ओळखीचा महत्त्वाचा भाग मानला जातो. तरीही आरोग्य आणि कामाच्या सोयीसाठी दरवर्षी उन्हाळ्यात अशी तात्पुरती सवलत दिली जाते.

या निर्णयामुळे वकिलांना काम करताना अधिक आरामदायी वातावरण मिळेल, तसेच उष्णतेमुळे होणारा त्रास काही प्रमाणात कमी होण्याची आहे.

### डॉ.कल्याणीची सुपर स्पेशलिस्ट न्यूरोलॉजिस्ट शिक्षणासाठी निवड

सरोजिनी नायडू वैद्यकीय महाविद्यालयात डॉ.कल्याणीची निवड झाली आहे. बीड शहरातील वृत्तपत्र विक्रेते सुदाम चव्हाण यांची ती कन्या आहे. बीड जिल्ह्यातील न्यूरोलॉजिस्ट सुपर स्पेशलिस्ट पहिली महिला डॉक्टर म्हणून डॉ. कल्याणी हिने ओळख निर्माण केली आहे.

डॉ.कल्याणी हिने वैद्यकीय पदवी परीक्षा एमडी मेडिसिन २०२५ मध्ये पूर्ण केली आहे. या परीक्षेमध्ये राज्यातील टॉप रँक ४५ वा क्रमांक मिळवत तिने हे यश संपादित केलेले आहे. एमडी सुपर स्पेशलिस्ट परीक्षेमध्ये देश पातळीवर सर्वोच्च रँक मिळवण्याचा बहुमान देखील तिने मिळवला आहे. यातूनच डॉ.कल्याणी हिची न्यूरोलॉजिस्ट सुपर स्पेशलिस्ट करिता निवड झाली आहे. ही पदवी वैद्यकीय क्षेत्रामधील सर्वोच्च पदवी आहे, जी विशिष्ट आजारावर प्रगत निदान आणि उपचारसाठी असते (उदाहरणार्थ हृदय, मेंदू, किडनी ) या उपचारासाठी प्रगत निदान आणि उपचारासाठी सुपर स्पेशलिस्ट डॉक्टर तयार करते हे तज्ज्ञ कार्डिओलॉजिस्ट, न्यूरोलॉजिस्ट, नेफ्रॉलॉजी या सारखे शाखांमध्ये उच्चस्तरीय आरोग्य सेवा प्रदन करण्याचे काम केले जाते. यामध्ये बीड येथील डॉक्टर कल्याणी हिची गर्व्हन्मेट सीट सुपर स्पेशलिस्ट न्यूरोलॉजिस्ट शिक्षणासाठी पात्र झाली आहे.

डॉक्टर कल्याणी चव्हाण ही बीड येथील न्यूज पेपर वितरक सुदाम चव्हाण यांची कन्या असून माजी आर्मी ऑफिसर ले. त्रिंबकराव तीपाले यांची सून आहे. एमडी मेडिसिन डॉ. राजगोपाल त्रिंबकराव तिपाले हे पती असून ते लोणी प्रवरानगर येथे सीनियर डॉक्टर म्हणून कार्यरत आहेत. डॉक्टर कल्याणी हिने स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय येथून एमबीबीएस पदवी शिक्षण पूर्ण केले आहे. सोलापूर येथील व्हीएमजीएमसी वैद्यकीय महाविद्यालयातून एमडी मेडिसिन पदवी प्राप्त केली. पुढे डीएमची सुपर स्पेशलिस्ट परीक्षामध्ये यश मिळवले. आता उत्तर प्रदेश मधील आग्रा येथे सरोजिनी नायडू वैद्यकीय महाविद्यालयात न्यूरोलॉजिस्ट करिता निवड झाली तसेच प्रवेशही मिळवला आहे.

कल्याणीने लहानपणी पाहिलेले स्वप्न पूर्ण केले

कल्याणी हिचे प्राथमिक शिक्षण बीड शहरातील संस्कार विद्यालय येथे झाले. इयत्ता सहावी ते बारावीचे शिक्षण गढी येथील नवोदय विद्यालय येथे पूर्ण झाले. एमबीबीएस ही पदवी स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय महाविद्यालय अंबाजोगाई येथे मिळवली. सोलापूर येथील व्हीएमजीएमसी वैद्यकीय महाविद्यालयातून एमडी मेडिसिन पदवी प्राप्त केली. आता सुपर स्पेशलिस्ट न्यूरोलॉजिस्ट शिक्षण घेण्यासाठी आग्रा येथे प्रवेश मिळवला आहे. कल्याणी हिने लहानपणी वैद्यकीय क्षेत्रामध्ये सर्वोच्च शिक्षण मिळवण्याची पाहिलेले स्वप्न स्वतःच्या बुद्धिमत्ता आणि जिद्दीच्या बळावर पूर्ण केले आहे, याचा अभिमान वाटतो.

- सुदाम चव्हाण (वडील)

तिच्या हातून देश सेवा घडो

कल्याणी अगदी लहानपणापासूनच शिक्षणामध्ये विशेष लक्ष देत असे. तिच्या शिक्षणाच्या काळात अत्यंत मेहनती आणि अभ्यासू म्हणून शिक्षक तिचे कौतुक देखील करत होते. शालेय शिक्षण करत असतानाच इयत्ता दहावीमध्ये तिची जपान येथील रिजनल सायन्स विशेष कार्यशाळेसाठी ( २०११ जेनेसेस प्रोग्राम जापान ) निवड करण्यात आली होती. या कार्यशाळेमध्ये तिने भारत देशाचे प्रतिनिधित्व केले होते. याच मेहनत आणि जिद्दीवर आमच्या चव्हाण परिवारातील पहिली डॉक्टर व बीड जिल्ह्यातील पहिली महिला न्यूरोलॉजिस्ट होण्याचा बहुमान कल्याणी हिने मिळून दिला आहे. वडिलांच्या कष्टाचे लेकीने सुवर्ण दिवसांमध्ये रूपांतरित केले आहे. तिच्या हातून देश सेवा घडो हीच अपेक्षा.

- आशा सुदाम चव्हाण (आाई)

### हर्षवर्धन सदगीर झाला महाराष्ट्र केसरी...

महेंद्र गायकवाड यानं पहिल्या हाफमध्ये १ गुण मिळवत आघाडी घेतली. यानंतर हर्षवर्धन सदगीर याने एक गुण मिळवत बरोबरी केली. पहिला हाफ संपेपर्यंत १-१ असा सामना बरोबरीत होता. दुस-या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याला एक्टिव्हिटी टास्क देण्यात आला, यात त्याला गुण मिळवता आला नाही. यामुळे हर्षवर्धन सदगीरला एक गुण मिळाला. यानंतर हर्षवर्धन सदगीर याने दोन गुण मिळवले. अशा प्रकारे हर्षवर्धन सदगीर याने ४-१ अशी आघाडी मिळवली. यानंतर हर्षवर्धन सदगीर बाहेर गेल्याने एक गुण महेंद्र गायकवाडला मिळाला. कुस्तीचा वेळ संपला तेव्हा हर्षवर्धन सदगीर याने ४-२ असा विजय मिळवला. महेंद्र गायकवाड यानं माती विभागातील अंतिम फेरीत सिकंदर शेखचा पराभव केला. तर हर्षवर्धन सदगीर याने जय पाटील याचा गादी विभागातील अंतिम फेरीत केला. यामुळे महाराष्ट्र केसरीच्या अंतिम लढतीत हर्षवर्धन सदगीर आणि महेंद्र गायकवाड आमने सामने आले.

माती विभागाच्या अंतिम फेरीत सोलापूर जिल्ह्यातून महेंद्र गायकवाड आणि हिंगोली जिल्ह्यातून सिकंदर शेख आमने सामने आले होते. या कुस्तीत महेंद्र गायकवाड याने ३-० असा विजय मिळवला. पहिल्या हाफमधील पहिल्या मिनिटातच महेंद्र गायकवाड याने २ गुण मिळवले. यानंतर पुन्हा एकदा महेंद्र गायकवाड याने १ गुण मिळवला. पहिल्या हाफमध्ये महेंद्र गायकवाड ३-० अशा आघाडीवर होता. दुस-या हाफमध्ये महेंद्र गायकवाड याच्या विरोधात सिकंदर शेख याने गुण मिळवण्यासाठी प्रयत्न केले. मात्र, सिकंदर शेख याला गुण मिळवण्यात अपयश आले. यामुळे महेंद्र गायकवाड याने मॅटवर होणा-या अंतिम फेरीत प्रवेश केला.

पान ६ वरून

### आ.सुरेश धस यांच्यामुळे

च्या खात्यात जमा करण्या साठी शासनाकडून तयार करण्यात येणारा अधिकृत डिजिटल आदेश म्हणजे एफटीओ होय. हा आदेश तयार झाल्यानंतरच संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात थेट पैसे वर्ग केले जातात. त्यामुळे एफटीओ ही संपूर्ण देयक प्रक्रियेतील अत्यंत महत्त्वाची अंतिम पायरी मानली जाते.

या गंभीर प्रश्नाची दखल घेत आमदार सुरेश धस यांनी रोहयो मंत्री भरत गोगावले तसेच नरेगा विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी पाठपुरावा केला. यानंतर जुन्या आणि अडचणीत असलेल्या कामांचे एफटीओ डिलीट करून प्रक्रिया नव्याने मार्गी लावण्याचे निर्देश देण्यात आले.

### लवूळ ग्रामपंचायतीचा मनमानी कारभार

आहे. ग्रामपंचायतीला कोणतेही शासनाचे व इतर काही योजना कोणत्याही फंडातून व आयोगातून असेल तर त्याचे काम सर्व सदस्यांना विश्वासात घेऊन करणे गरजेचे आहे कारण जनतेने सर्वांनाच निवडून गाव विकासासाठी दिलेले आहे. सदस्यांना विश्वासात घेतले तर गावाला आणखीन चालना मिळेल. काही जणांच्या म्हणण्यानुसार आम्हाला तर काही कामाची माहितीच नसते. काम सुरू झाल्यानंतरच हे काम कोण गुत्तेदार करत आहे, याची माहिती पुन्हा मिळत आहे. मध्यंतरी जलपुरवठा,योजनेच्या टाकीतून काही रस्त्याच्या साईड पट्ट्यासाठी पाणी दिले ही गावासाठी चांगली बाब आहे पण यासाठी काही निधी कोणी घेतला असेल तर ते गावाच्या हितासाठी नाही, याची सुद्धा चर्चा मध्यंतरी सुरू होती. कोणीही गावाच्या विकासासाठी कामे करीत असेल तर ते काम चांगल्या दर्जाचे होणे आवश्यक आहे. थातूरमातूर कामे जास्त काळ टिकत नाही हे मात्र तितकेच खरे आहे. काहीतरी उडवाउडवीचे उत्तरे देणे म्हणजे जनतेच्या हिताचे नाही यासाठी जनतेलाही एखादे वेळेस मोठे आंदोलन व आमरण उपोषण सारखे मार्ग माहिती न दिल्यास करावे लागेल, हे लक्षात ठेवणे गरजेचे आहे. या सर्व ग्रामपंचायतच्या कारभाराची जोरदार चर्चा आजतरी ग्रामस्थांतून होत आहे.

### सखाराम भंडारे यांचे निधन

प्रतिष्ठान,बार्शी रोड, बीड येथील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार केले जाणार आहेत.मुंबई पोर्ट ट्रस्टचे उपअभियंता इंजि. महेंद्र , शशिकांत व स्व. उमाकांत भंडारे यांचे ते वडील होत. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी,जावई, सुना व नातवंडे असा परिवार आहे. भंडारे परिवाराच्या दुःखात पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

### चकलांबा येथील रोकडेश्वर मंदिरात परंपरेनुसार धर्मध्वज उभारला

धार्मिक सत्कर्म करतात. चकलांबा येथे ड .संदीप रोकडे, देविदास रोकडे, ग्रामपंचायत सदस्य कुंडलिक गुंजाळ, अनिकेत छाजेड, आदीसह गावातील मान्यवर, भाविकांची यावेळी उपस्थिती होती.

### आज माजलगावात

या व्याख्यानमालेत धर्म, संस्कृती, इतिहास, समाजएकता व युवकांची भूमिका या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार असून मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहण्याची अपेक्षा आयोजकांनी व्यक्त केली आहे.त्यानंतर दिनांक २६ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता श्री हनुमान मंदिर, हनुमान चौक येथे रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले आहे. समाजातील रुग्णांना वेळेवर रक्त उपलब्ध व्हावे आणि युवकांमध्ये रक्तदानाबाबत जागृती निर्माण व्हावी, या उद्देशाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले असल्याचे समितीने सांगितले. याच दिवशी सकाळी ११ वाजता धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज चौक ते झेंडा चौक दरम्यान भव्य मोटारसायकल रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीमध्ये युवक मोठ्या संख्येने सहभागी होणार असून सायंकाळी ४ वाजता श्रीरामांची शोभायात्रा निघणार आहे. श्रीराम नवमी उत्सव समिती, माजलगाव आयोजित या सर्व कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी, युवकांनी व भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन श्री राम नवमी उत्सव समिती, माजलगाव यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### तरुणावर टोळक्याचा प्राणघातक हल्ला

मात्र प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्याला तात्काळ बीड जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले. डॉक्टरांनी त्याची प्रकृती चिंताजनक असल्याचे सांगितले आहे. गेवराई शहरातील मुख्य भागातच गंभीर घटना घडूनही मुलींचा कडून हल्लेखोरांना कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. यामुळे गेवराई पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित होत असून पोलिसांचे भय संपले का? असा सवाल नागरिकांमधून उपस्थित होत आहे.या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी जखमी तरुणाच्या कुटुंबीयांकडून करण्यात येत आहे.

### पत्रकार अमोल मुळे यांना पुरस्कार जाहीर

सन्मानचिन्ह असे पुरस्काराचे स्वरूप आहे. मा मुख्यमंत्री व इतर मान्यवरांच्या उपस्थितीत मुंबई येथे लवकरच वितरण सोहळा पार पडणार आहे.

### सर्व संकटात रक्षण करणारा महामंत्र 'रामरक्षा स्तोत्र'–श्री श्री शंकर भारती महास्वामी

निर्माण होऊ नये. घरात, कौटुंबिक समस्या या सर्वापासून रक्षण होण्यासाठी रामरक्षा स्तोत्र हा मंत्र सर्वात महत्त्वाचा आहे. कोणत्याही कर्तव्यात बाधा उत्पन्न होऊ नये यासाठी हे स्तोत्र मुखोद्गत असावे, संकटात त्याचे स्मरण होताच संकटातून मार्ग मिळतो. या स्तोत्रात प्रभू श्रीरामाचे विविध नामासह गुणवर्णनाची शक्ती आहे, याचे नित्य स्मरण करत जावे, असा संदेश आजच्या रामरक्षा संवाद प्रसंगातून सर्व भाविक भक्तांना मिळाला. संयोजन समितीच्या वतीने ड.दीपककाका कुलकर्णी, संपादक दिलीपराव खिस्ती ,ह भ प भार्गव महाराज जोशी यांनी बाळूशेठ मुंदडा परिवाराचे स्वागत केले ,सर्व उपस्थितांना आशीर्वादपर प्रसादाचे वाटप यावेळी करण्यात आले.

### गंभीर गुन्ह्यातील आरोपी महिन्यापासून फरार

अशी उघड धमकी दिल्याचे नमूद करण्यात आले आहे. सदरील आरोपीचा काबाड गल्ली भागात अवैध दारू धंदा असल्याने सर्व पोलीसाची लागेबांधे असल्याने त्याला पोलिसांचे अभय मिळत असल्याची चर्चा होत आहे.याशिवाय, आमचे पोलिसांशी संबंध आहेत आणि आम्ही बेकायदेशीर धंद्यांतून पोलिसांना हप्ते देतो, असा दावा आरोपींकडून केल्याचा आरोपही तक्रारीत करण्यात आला आहे. तसेच मदत करणाऱ्यांना खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी दिल्याचेही समोर आले आहे.या प्रकारामुळे तक्रारदार कुटुंब भीतीच्या छायेखाली जीवन जगत असून त्यांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. संबंधित आरोपींना तात्काळ अटक करून कडक कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येत आहे. दरम्यान, या घटनेमुळे बीड शहरातील कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला असून, पोलिस प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलून नागरिकांचा विश्वास पुनर्स्थापित करणे गरजेचे असल्याची भावना व्यक्त होत आहे.

### न्याय मागण्यांसाठी महिला पदाधिकाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

चार मिटर एवढी अधिक केली आहे. त्यामुळे भविष्यात दोन्ही मार्गाची एकत्रित वाहूतक होणार आहे .हे अंतर निमुळता रस्ता वाहन चालकांसाठी 'मौत का कुआ ' बनेल!. कंत्राटार कंपनीच्या भल्यासाठी जबादार प्रशासनाने नागरिकांच्या रास्त मागण्यांकडे सोईस्कर कानाडोळा केल्याने संताप व्यक्त होत आहे. दुसरीकडे शिरुर शहराचा कायमचा पाणीप्रश्न मार्गी लावण्यासाठी ७९ कोटी रुपयांची सिंदफणा मध्यम प्रकल्पातून प्राधिकरणाच्या पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे. याच मार्गावरुन पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिनीचे (खोदाई-गाडणे) काम नियोजित आहे. शहरीकरणातील प्रगतीपथावरील मार्गाचे कन्स्ट्रक्शनचे काम येत्या महिन्याभरात पूर्ण होणार आहे. आधिच हद्दीची विसंगती त्यात रस्त्याचे कन्स्ट्रक्शन पूर्ण झाल्यानंतर प्राधिकरणाची १२ (एकफूट) जलवाहीनी खोदण्याचे व गाडण्याचे काम रस्ता हद्द सोडून करणार कसे? रस्ता हद्दीतून कामाची नुकसान भरपाई कोण करणार? रस्ता हद्द वगळता जलवाहीनीच्या कामासाठी नगरपंचायत प्रशासनाला हद्दीचे कोडे सुटणार काय? असे अनेक प्रश्न 'आ' वासून आहेत. रस्त्याच्या कन्स्ट्रक्शनमधून पाणीपुरवठ्याच्या जलवाहिनीचे काम करणे शक्य झाल्यास, राष्ट्रीय महामार्ग प्रशासनाची नुकसान भरपाईचा आकडा कोटीत असणार आहे. वार्षीक बजेट लाखात असलेलं नगरपंचायत प्रशासन महामार्ग प्रशासनाची कोटीत नुकसान भरपाई देणार आहे का? नुकसान भरपाईसाठी दोन्ही प्रशासनाच्या वादात पालखीमार्गाला पुन्हा कायमची दुरावस्था सोसावी लागणार आहे. पालखी मार्ग प्रशासनाने शहर विस्तारीकरणाच्या विचाराधीन राहून मार्गाची वाढीव हद्द निश्चित करावी, प्रगतिपथावरील पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहीनीच्या कामासाठी कन्स्ट्रक्शनची हद्द वगळून मार्कआऊट करणे क्रमप्राप्त आहे. यासह इतर समस्यांचे निवारण व शहरवासीयांच्या न्याय, हक्कासाठी नगरपंचायतच्या बांधकाम सभापती सुनिता अक्षय रणखांब यांनी जिजामाता चौकात आंदोलनाचा इशारा दिला आहे. जबाबदार प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी सभापती सुनिता अक्षय रणखांब यांनी तहसीलदार यांना पूर्वीच मागण्यांचे निवेदन दिले होते मात्र, निगरगठ्ठ, संवेदनाहीन, निष्क्रिय, नगारिकांच्या समस्यांचे सोयरसूतक नसलेल्या जबादार प्रशासनाने सोईस्कर कानाडोळा केला. झोपेचे सोंग घेणार्या प्रशासानाला सामान्यांच्या आर्त हाकेने जागे करण्यासाठी जिजामाता चौकात आयोजीत आंदोलनामध्ये सहभागी होण्याचे आवाहन सभापती सुनिता रणखांब यांनी केले आहे. निर्लज्ज प्रशासनाच्या निष्क्रियेतचा कळस : साधारणतःचार वर्षापूर्वी पालखी मार्गाच्या नालीच्या कन्स्ट्रक्शन कामात शिरुर शराला पाणीपुरवठा करणार्या महाजल योजनेची जलवाहिनी फुटली. प्रभाग क्रमांक १७ व १२ मधे पालखी मार्गाच्या कन्स्ट्रक्शन कामात जलवाहिनी नादूरुस्त झाल्याने प्रभागातील पाणीपुरवठा खंडीत झाला. तेव्हापासून आजतागायत पाणीपुरवठा खंडीत आहे. सातत्याने प्रभागाच्या विस्तारीत भागातील नागरिक नगरपंचायत कार्यालयात पाण्याच्या मागणीसाठी गेले असता 'पालखी मार्गाच्या कामात जलवाहिनी फुटली आहे, त्यामुळे पाणी पुरवठा खंडीत आहे. तुम्ही त्यांना (पालखी मार्ग प्रशासन)सांगा जलवाहिनी दुरुस्त करून द्यायची आम्ही सुरळीत पाणीपुरवठा करू' असे उत्तर मिळत राहिले. मात्र, दोन्ही प्रशसनाच्या विसंगतीतून नागरिकांचा चार वर्षापासून घसा कोरडाच आहे. शिरुरकरांना पाणी मागण्यासाठी छ.संभाजीनगरला जावे लागेल : सिंदफणा मध्यम प्रकल्पातून शहराकडे येणारी जलवाहिनी प्रभाग क्रमांक १७व१२ मधून पालखी मार्गाच्या हद्दीतून प्रवाहित होणार आहे . आधिच हद्दीचा पेच त्यात कन्स्ट्रक्शनमधून जालवाहिनीचे काम केल्यास, भाविष्यात जलवाहिनीच्या दुरुस्ती अभावी शिरुरकरांना पाण्याच्या मागणीसाठी थेट राष्ट्रीय महामार्ग छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालय छ. संभाजीनगर गाठावे लागणार.

### हर्षवर्धन सदगीर ठरला महाराष्ट्र केसरीचा विजेता

बहुमानही त्याने मिळवला आहे. चुरशीच्या अंतिम लढतीत नाशिकच्या हर्षवर्धन सदगीर याने महेंद्र गायकवाडचा ४-३ अशा फरकाने पराभव केला. पुण्यातील या प्रतिष्ठेच्या लढतीकडे संपूर्ण राज्याचं लक्ष लागून होतं. सोलापूरचा महेंद्र गायकवाड म्हणजे आक्रमक अंदाजात खेळ करणं आणि हर्षवर्धनने मात्र या लढतीत आक्रमक आणि संयम खेळ यांचा अचूक मेळ साधला. यासह तो महेंद्र गायकवाडला टक्कर देत मानाची चांदीची गदा पटकावण्यात यशस्वी ठरला. हर्षवर्धन हा महाराष्ट्राचा सातवा डबल केसरी ठरला.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक,संपादक गंमत भंडारी यांनी शाम प्रिंटर्स, नवी भाजी मंडई बीड येथे छापून पार्श्वभूमी कार्यालय, नवी भाजी मंडई रोड, बीड येथे प्रकाशित केले. फोन नं. (०२४४२) २३०१०१.
AR/TECH/Regd. N.P./34/Beed/99-2000 RNI Regd.no. MAHMAR/1990/501 E-mail Address-parshvabhoomi@gmail.com

### मेव्हणा व सासऱ्या विरोधात जावयाने दिली तक्रार ; पोलिसात गुन्हा दाखल

केज दि २२(प्रतिनिधी) - चक्क जावयाला धमक्या देवून जमीन मागणा-या सासरा व मेहुण्या विरुध्द केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुन्या भांडणाच्या कारणावरून तु आमच्या वर केलेल्या केसेस मागे घे व केज तालुक्यातील मौजे टाकळी येथील सर्व्हे क्रमांक ७७ मधील शेत जमीन माझ्या नावावर कर असे म्हणून शिवीगाळ व जिवे मारण्याच्या धमक्या देणारा मेव्हणा जूनेद उर्फ जोजो आणि सासरा शेख शाकेर अहेमद या दोघांविरुध्द ॲड. सलाहुद्दीन काझी यांच्या तक्रारी वरून भारतीय न्याय संहिता चे कलम ३५१ (२), ३५२ आणि ३ (५) प्रमाणे केज पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती सूत्रांनी दिली या गुन्ह्याचा तपास तपास पोलीस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शना खाली केज पोलिस करीत असल्याचे सांगण्यात आले..

# पार्श्वभूमी

### नांदेडमध्ये दुचाकीचा स्फोट होऊन तरुणाचा होरपळून जाग्यावर मृत्यू

नांदेड दि २२ (प्रतिनिधी) -नांदेडमधील वाजेगाव बंधारा परिसरात एका धावत्या दुचाकीचा अचानक भीषण स्फोट होऊन दुचाकीने पेट घेतल्यानंतर या आगीत दुचाकीस्वार तरुणाचा होरपळून मृत्यू झाला आहे. तर पोलिसांनी ही घटना गांभीर्याने घेतली असून त्या दृष्टीने तपास सुरू केला आहे.सदर घटना घडल्यानंतर प्राथमिक पाहणीत दुचाकीजवळ काही संशयास्पद वस्तू सापडल्याने प्रकरणाचे गांभीर्य ओळखून तातडीने दहशतवादविरोधी पथक आणि फॉरेन्सिक तज्ज्ञांना बोलावण्यात आले . पोलीस सध्या तांत्रिक बाबी आणि सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे सर्वच बाजूंनी तपास करत आहेत. ईदनिमित्त शनिवारी सकाळी शहरातील मुख्य ईदगाह मैदानावर अनेक मुस्लिम बांधव नमाजासाठी जमले होते. या ठिकाणापासून काही अंतरावरच असलेल्या वाजेगाव बंधारा परिसरात सकाळी ९.३० च्या सुमारास एक तरुण दुचाकीवरून जात होता. यावेळी अचानक दुचाकीचा मोठा स्पट झाला आणि क्षणार्धात आगीने रौद्र रूप धारण केले.



## बीडमध्ये अखेर नवीन सिग्नल बसविण्यास सुरुवात ; वंचितने केले होते सतत आंदोलन




बीड दि २२(प्रतिनिधी) - शहरातील अनेक वर्षांपासून बंद अवस्थेत असलेले सिग्नल व सीसीटीव्ही कॅमेरे याबाबत सातत्याने पाठपुरावा आणि आंदोलन केल्यानंतर अखेर आज दिनांक २२ मार्च २०२६ रोजी बीड शहरात नवीन सिग्नल बसविण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली तर सीसीटीव्ही कॅमेरेही कार्यान्वित करण्यात आले आहेत.

वंचित बहुजन आघाडी, बीड शहराच्या वतीने या प्रश्नावर वारंवार निवेदने, तक्रारी व आंदोलन करण्यात आले होते. या संपूर्ण प्रश्नाचा पाठपुरावा वंचितचे नेते मिलिंद सरपते यांनी सातत्याने केला होता. अकार्यक्षम प्रशासनाच्या निषेधार्थ बंद सिग्नल व कॅमेऱ्यांना हार अर्पण करत आंदोलनही करण्यात आले होते.शहरातील प्रमुख चौकांमध्ये सिग्नल व सीसीटीव्ही कॅमेरे बंद असल्यामुळे वाहतूक नियंत्रणावर परिणाम होत होता तसेच गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलिसांना अडचणी येत होत्या. या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत होती.दरम्यान, प्रशासनाने या गंभीर बाबीची दखल घेत सिग्नल व सीसीटीव्ही व्यवस्था सुरू केली असून लवकरच शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.या कामामुळे शहरातील नागरिकांना दिलासा मिळाला असून, शहराच्या सुरक्षिततेतही यामुळे मोठी भर पडणार आहे.

# अशोक खरात संदर्भातील गुन्ह्यात पीडितेची ओळख पटणारे कोणी व्रतांकन केल्यास गुन्हे दाखल करणार

## नाशिकच्या विशेष तपास प्रमुखांचा प्रेस नोट मधून इशारा

नाशिक दि २२(प्रतिनिधी)- नाशिक येथे पीडित महिलेच्या तक्रारीवरून अशोक खरात याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला हे प्रकरण महाराष्ट्रभर गाजू लागला असतानाच काही बातम्यांमध्ये पीडित महिलेची ओळख पटेल असे फोटो व्हिडिओ तसेच पत्ता गाव असे वृतांकन केल्याने सदर पीडितेचे कुटुंब मानसिक तणावात आहे. तेव्हा सदर गुन्ह्याबाबत व्रतांकन करताना पीडित महिलेची ओळख उघड होणार नाही याची खबरदारी घ्यावी. अन्यथा भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७२ (१) नुसार कठोर कारवाई करण्यात येईल असा इशारा या होण्याचा तपास करणाऱ्या नाशिक विशेष तपास पथक प्रमुखांनी प्रेस नोट मधून दिला आहे.

सदर गुन्ह्याचा तपास करणाऱ्या नाशिकच्या विशेष तपास पथकाने न्युज चॅनल्स, न्युज चॅनल्सचे इन्स्टाग्राम हॅन्डल्स, यु ट्यूब न्युज पोर्टल्स, ऑनलाईन न्युज पोर्टल्स, इन्स्टाग्राम न्युज पोर्टल्स व इतर सोशल मिडीया आधारीत बातमीपत्र धारक यांना प्रेस नोट द्वारेआवाहन करण्यात येते की, आरोपी अशोक खरात याचे विरुध्द सरकारवाडा पोलीस स्टेशन गु.र.नं.७३/२०२६ बी.एन.एस. कलम ६४(१), ७४, ३५१(२) सह महाराष्ट्र नरबळी आणि इतर अमानुष अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोना प्रतिबंधक अधिनियम कलम ३(१) (२) अन्वये दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास विशेष तपास पथक करत आहे.काही बातम्यांमध्ये पिडीत महिलेची ओळख उघड होईल असे वक्तव्य, फोटो, व्हीडीओ, पिडीत महिलेचा पत्ता, पिडीत महिलेचे नातेवाईकांची नांवे, पिडीत महिलेचे गांवाचे नांव, फिर्यादीतील संपूर्ण घटनाक्रम - ज्यावरून पिडीत महिलेची ओळख उघड होईल असे वृत्तांकन केल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे पिडीत महिला आणि तिचे कुटूंबीय हे प्रचंड मानसिक तणावात आहेत.भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७२ (१) नुसार नमूद अपराधांना बळी पडलेल्या महिलांची कोणतीही ओळख उघड करता येत नाही, कोणत्याही बाबतीत पिडीत महिलेची ओळख उघड झाल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७२ (१) अन्वये गुन्हा नोंद होवून त्यात दोन वर्षाचा कारावास व द्रव्यदंड अशी शिक्षा नमूद केलेली आहे. तरी याद्वारे सर्वांना आवाहन करण्यात येते की, सदर गुन्ह्याबाबत बातमी, वृत्तांकन, करताना पिडीत महिलेची ओळख उघड होणार नाही याची सर्वांनी खबरदारी घ्यावी. जर आपल्या बातमी मुळे पिडीत महिलेची ओळख उघड झाल्यास भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ७२ (१) नुसार आपणाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल असा इशारा विशेष तपास पथक प्रमुख नाशिक यांनी प्रेस नोट मधून दिला आहे.

## आदर्श शिक्षक पुरस्कार युवराज हिरवे यांना पुरस्कार जाहीर

केज दि २२ (प्रतिनिधी) - तालुक्यातील कळमआंबा येथील रहिवासी व मानेवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक युवराज अभिमन्यू हिरवे यांच्या शैक्षणिक



उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन ध्येय एज्युकेशन फाउंडेशन कडून राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

शिक्षण क्षेत्रातील सातत्यपूर्ण कार्य, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कायम धडपड, विविध शैक्षणिक उपक्रमातील नाविन्यता, सामाजिक उपक्रमात सक्रिय योगदान शाळा परिसर व गाव परिसर ५०० च्या वर झाडे लावुन संगोपन केले. लोक सहभागातुन विद्यार्थ्यांना लॅपटॉप संगणक दिले. शाळा परिसर तंबाखूमुक्त केला व तालुक्यातील शाळा परिसर तंबाखुमुक्त करण्यासाठी तालुका समन्वयक म्हणुन कार्य केले. आडस केंद्र तंबाखु मुक्त केले. बालविवाह रोखण्यासाठी केंद्र समन्वयक म्हणुन कार्य केले. पाणी फाऊडेशन वॉटरकप स्पर्धा हिरीरीने सहभाग, गावाला व्दितीय क्रमांकाचे बक्षीस मिळवुन दिले. अधिकाऱ्याची दखल घेऊन त्यांना जाहीर झालेला पुरस्कार ग.दि. माडगूळकर नाट्य गृह निगडी पिंपरी चिंचवड पुणे या ठिकाणी विविध मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. .

### क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी स्वप्निल शिंदेची निवड

बीड दि २२( प्रतिनिधी)- अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेच्यावतीने क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यासाठी बीड शहर क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीची नूतन कार्यकारणी निवडण्यात आली असून अध्यक्षपदी स्वप्निल शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस ॲड. सुभाष राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांची १९९ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्याची ठरविण्यात आले आहे. यानिमित्त कार्यक्रमाची रूपरेषा ठरविण्यात आली असून नूतन कार्यराज्याचीमता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांच्या प्रमुख उपस्थितीत जाहीर करण्यात आली आहे. यामध्ये जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी स्वप्नील शिंदे, उपाध्यक्षपदी आदित्य शिंदे, सचिव शरद विटकर, कोषाध्यक्ष महेश व्यवहारे, सहसचिव निखिल भालेराव, सहकोशाध्यक्ष रोहित जमदाडे यांची निवड जाहीर करण्यात आली आहे.

यावेळी परीट समाजाचे प्रदेशाध्यक्ष गणेश जगताप, श्री संत शिरोमणी नरहरी महाराज जयंती महोत्सवाचे संस्थापक ॲड. संदीप बेदरे, समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष निखिल शिंदे, जिल्हा उपाध्यक्ष तथा नगरसेवक नितीन साखरे, शहराध्यक्ष नितीन राऊत, नगरसेवक भारत कांबळे, विष्णू यादव, नवनाथ दोडके, जयंती महोत्सव समितीचे माजी अध्यक्ष अजिंक्य सुरवसे, सिद्धू गायकवाड, धनगर समाजाचे युवा नेते रणजीत सोन्नर, नाभिक समाजाचे युवा नेते तुषार दोडके, यांच्यासह समता परिषदेचे पदाधिकारी, समता सैनिक आणि फुले प्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपूर्ण कार्यक्रमात लाभलेले सर्वांचे प्रेम सहकार्य सेवाभाव हेच आमचे बळ -हभप केशव महाराज

चिंचोली माळी दि २२ (प्रतिनिधी) - भगवान श्रीकृष्णाच्या कृपेने, महान तपस्वी परम त्यागी श्री १०८ स्वामी चिन्मय पुरी जी महाराज (हिमाचल प्रदेश), तसेच महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध रामायणाचार्य ह.भ.प. रामराव महाराज ढोक यांच्या पावन उपस्थितीत श्रीकृष्ण मंदिर भूमिपूजन १०८ कुंडी महाविष्णूयाग यज्ञ, संगीत रामकथा व अखंड हरिनाम सप्ताह हा नऊ दिवसांचा सोहळा अत्यंत भक्तीमय वातावरणात यशस्वी रित्या पार पडला. या संपूर्ण कार्यक्रमात लाभलेले आपले प्रेम, सहकार्य आणि सेवाभाव हेच आमच्यासाठी खरे बळ ठरले. या दिव्य धार्मिक सोहळ्याच्या निमित्ताने सर्व भाविक भक्तांचे ह भ प भागवत भूषण केशव महाराज शास्त्री यांनी आभार मानले.

केज शहरापासून जवळ असलेल्या व केज बीड रस्त्यावरील आश्रमात आयोजित केलेला धार्मिक उत्सव नुकताच संपन्न झाला त्यानिमित्त आभार मानताना ह भ प केशव महाराज म्हणाले की सर्व जाती-धर्मातील भक्तभाविकांनी दिलेल्या देणग्या, तसेच महाप्रसाद पंगतीसाठी पुढाकार घेणाऱ्या अन्नदात्यांचे योगदान हे खरोखरच प्रेरणादायी आहे. तसेच, या भव्य सोहळ्याला यशस्वी करण्यासाठी रात्रंदिवस परिश्रम घेणाऱ्या स्वयंसेवकांचे, तसेच पंचक्रोशीतील आश्रमावर प्रेम करणाऱ्या प्रत्येक भक्ताचे मनःपूर्वक कौतुक आणि आभार व्यक्त करतो. आपल्या सर्वांच्या सहकार्यामुळेच श्रीकृष्ण मंदिर उभारणी चे हे पवित्र कार्य अधिक भक्कम होत आहे. हीच एकजूट, हा सेवाभाव आणि ही भक्ती भविष्यात ही अशीच कायम राहो, हीच श्रीकृष्ण चरणी प्रार्थना करून श्रीकृष्ण आश्रम व भक्त परिवार, केज आपल्या सर्वांच्या सहकार्या बद्दल मनःपूर्वक धन्यवाद अशा शब्दात भागवत भुषण ह.भ.प. केशव महाराज शास्त्री व ह.भ.प.विष्णु महाराज राऊत यांनी भाविक भक्तांचे आभार व्यक्त केले आहेत.

## पिंपळवंडी येथील गणेश शहाणे यूवकाचे हृदयविकाराने निधन

पिंपळवंडी दि.२२(प्रतिनिधी) - पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील गणेश दिलीप शहाणे या अवघ्या ३३ वर्षे वयाच्या युवकाचे शनिवार दिनांक २१ रोजी हृदयविकाराच्या तीव्र धक्क्याने दुःखद निधन झाले .त्यांच्या दुःखद निधनाची वार्ता कळताच पिंपळवंडी व पिंपळवंडी परिसरातील नागरिकातून हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

गणेश हा कष्टाळू,शांत,मेहनती व संयमी, मनमिळाऊ स्वभावाचा कर्तबगार मुलगा होता.त्याच्या अचानक जाण्याने परिसरात शोककळा पसरली आहे.गणेश कुटुंबातील एकुलता एक कर्ता करविता मुलगा होता.त्याच्या अकस्मात दुःखद निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून कर्तबगार मुलगा गेल्याने आई-वडिलांचा आधार हिरावला आहे.गणेश हा श्रीरामपूर येथे इन्शुरन्स विमा कंपनीचे काम करत होता.कंपनीच्या कामानिमित्त तो दि.२१ शनिवार रोजी दुचाकीवरून कामावर गेला होता. दुचाकी चालवत असताना दुपारी २ वाजेच्या दरम्यान त्याला अचानक अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांनी दुचाकी थांबवली तो चक्कर येऊन जागीच पडला.त्याला उपचारासाठी रुग्णालयात नेले असता त्याची प्राणज्योत मालवली.त्याच्या पार्थिवावर रविवार दि.२२ सकाळी ८ वाजता शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.यावेळी सामाजिक,राजकीय, धार्मिक क्षेत्रातील तसेच व्यापारी,शिक्षक, परिसरातील आजी-माजी सरपंच, उपसरपंच,ग्रा.पं.सदस्य,चेअरमन, विविध पक्षाचे पदाधिकारी, मित्र परिवार,पत्रकार,नातेवाईक,ग्रामस्थ, परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.गणेशच्या पश्चात आई-वडील,पत्नी,विवाहित बहीण, चुलते-चुलती,चुलत भाऊ-बहिणी असा मोठा परिवार आहे.शहाणे परिवाराच्या दुःखामध्ये दैनिक पार्श्वभूमी परिवार सहभागी आहे.

### माजलगावात संस्कार भारतीतर्फे नववर्ष स्वागताचा संगीत सोहळा उत्साहात संपन्न

माजलगाव दि २२ (प्रतिनिधी)- हिंदू नववर्ष गुढीपाडवा निमित्त संस्कार भारती, माजलगाव यांच्या वतीने १९ मार्च रोजी श्री. ढुंढीराज टेंबे गणेश मंदिर येथे आयोजित केलेल्या बहारदार संगीत कार्यक्रमाला रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमात प्रमुख गायक संतोष बीडकर (लातूर) व सई बीडकर यांनी आपल्या सुरेल आवाजाने उपस्थितांची मनं जिंकली. त्यांना तबल्यावर मुकुंद मिरगे (बीड) तर संवादिनीवर कुणाल कुलकर्णी (माजलगाव) यांनी उत्तम साथ दिली. संगीतमय वातावरणात सादर झालेल्या विविध रचना आणि भावगीतांनी कार्यक्रम रंगतदार झाला.या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून श्रीमती प्रा.स्नेहल पाठक (प्रांताध्यक्ष, संस्कार भारती देवगिरी प्रांत), विपीन क्षीरसागर (जिल्हा कार्यवाह, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ,अंबाजोगाई), जगदीश साखरे (मा.संघचालक, रा.स्व.संघ, माजलगाव), संजयजी जळवेकर (तालुका कार्यवाह, रा.स्व.संघ, माजलगाव), ॲड.विश्वास जोशी (कार्यवाह, श्री सिद्धेश्वर शै.संकुल, माजलगाव) तसेच मधुकरबुवा रामदासी (आचार्य, श्रीराम मंदिर, माजलगाव) यांची प्रमुख उपस्थिती लाभली.उपस्थित मान्यवरांनी नववर्षाच्या शुभेच्छा देत सांस्कृतिक परंपरा जपण्याचे महत्त्व अधोरेखित केले.कार्यक्रमाचे आयोजन संयोजन समितीने उत्तम प्रकारे केले असून, नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.

# पोलिसांना शाप देणाऱ्यास देशाच्या सीमेवरउभे केले पाहिजे- रवींद्र शिनगारे

बीड -( प्रतिनिधी )- ''देशाचे रक्षण करण्यासाठी भारतीय सैनिक सीमेवर जीवाची बाजी लावतात, तर देशांतर्गत सुरक्षा आणि कायदा-सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस दल २४ तास ऊन, वारा, पाऊस आणि सण-वाराची तमा न बाळगता कर्तव्य बजावत असते. अशा कर्तव्यदक्ष पोलिसांना शाप देणाऱ्या आणि समाजाची दिशाभूल करणाऱ्यास आता धडा शिकवण्याची वेळ आली आहे. अशा प्रवृत्तीला देशाच्या सीमेवर उभे केले पाहिजे, मगच त्याला कर्तव्याची खरी जाणीव होईल,अशा कडक शब्दांत पोलीस बॉईज असोसिएशन महाराष्ट्रराज्याचे अध्यक्ष रवींद्र शिनगारे यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

शिनगारे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, सध्या समाजात काही स्वयंघोषित दैवशक्तीचा आव आणणारे लोक आपली दुकाने थाटून बसले आहेत. भोळ्या जनतेला आणि अंधभक्तांना आपल्या जाळ्यात ओढून त्यांचे आयुष्य उद्ध्वस्त करण्याचे काम हे लोक करत आहेत. वर्षानुवर्षे पिढ्यानपिढ्या लोकांचा छळ करणाऱ्या या भोंदूंचे दिवसाचे खेळ आता उघड झाले आहेत.केवळ स्वतःच्या स्वार्थासाठी पोलिसांसारख्या दलाला शाप देणाऱ्या अशा व्यक्तींचा जाहीर निषेध करतो, असेही त्यांनी नमूद केले.राज्याचे कुटुंबप्रमुख या नात्याने मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकरणाची गंभीर दखल घ्यावी, अशी विनंती शिनगारे यांनी केली आहे. ''पोलीस हे राज्याच्या कुटुंबाचा अविभाज्य भाग आहेत. त्यांच्या विरोधात गरळ ओकणाऱ्या या दोन तोंडी मांडुळाचे सर्व काळे कारनामे बाहेर काढून, न्यायव्यवस्थेच्या माध्यमातून त्याला आजीवन कारावासाची शिक्षा मिळवून द्यावी. जेणेकरून पोलीस कुटुंबाला खऱ्या अर्थाने न्याय मिळेल, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## चिमणी दिनाच्या सोहळ्यात गुणवंतांचा गौरव

अंबाजोगाई. दि २२ (प्रतिनिधी) - जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, सोनवळा येथे २० मार्च २०२६ रोजी जागतिक चिमणी दिनच साजरा करताना दोन रत्नसम विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा देखील पार पडला. चि. श्रीनाथ नंदकिशोर पतंगे याची सैनिक स्कूल आणि नवोदय विद्यालय या दोन्ही नामांकित संस्थांसाठी निवड तर , कु. स्नेहा सोनेराव पतंगे हिने सामान्य ज्ञान स्पर्धेत अंबाजोगाई तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. या दोन्ही विद्यार्थ्यांचा आणि त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणाऱ्या त्यांच्या पालकांचा यावेळी विशेष सन्मान करण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्षपद सोनेराव राठोड सर (मु.अ.)यांनी भूषविले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून दिनकरराव जोशी, अभिजितदादा जोंधळे, सदानंद वालेकर, सुंदरराव नेहरकर, प्रा.प्रदीप तरकसे सर यांची उपस्थिती लाभली. या मंगलप्रसंगी अरुणराव पतंगे, राधाकृष्ण पतंगे, विकास मस्के, नंदकिशोर पतंगे, सोनेराव पतंगे आणि श्रीराम पतंगे यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांच्या भविष्यातील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बीडवे सर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार देशमुख सर यांनी मानले.

### संपूर्ण महिनाभर उपवास केलेल्या नूबैदचा सत्कार करून केले कौतुक

बीड दि २२ (प्रतिनिधी) - शहरातील आसेफ़नगर भागात राहणारा साडेअकरा वर्षांच्या नुबैद वसीफ़ शेख याने रमज़ान महिन्याचे संपूर्ण रोज़े पूर्ण केले. याशिवाय शाळेच्या शिक्षणाची शिकवणी आणि अरबी मदरशातील शिकवणी सुद्धा सोडली नाही. त्याच्या या श्रद्धेबद्दल त्याचा सत्कार करून कौतुक करण्यात आले.

नूबैद हा पवित्र रमज़ान महिन्यात दररोज पहाटे ४.३० ते रात्री १० वाजेपर्यंत सतत मग्न राहिला. म्हणून त्याचे मोठे काका मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ यांनी त्याचे रमज़ान ईद दिवशी पुष्पहार व भेटवस्तू देऊन अभिनंदन करत सत्कार केला. यावेळी नुबैद चे वडील वसीफ़ शेख, काका नसीर शेख, काका पोलीस जमादार हनीफ़ शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच आजी-आजोबा, सर्व काकू, आत्या, सर्व बहिण-भाऊ आणि सर्व नातलग उपस्थित होते. नुबैदने महिनाभराचे रोज़े ठेवून नमाज़ पठण, शाळा आणि शिकवणी ला सुद्धा न चुकता उपस्थित राहिल्याने सर्वांनी त्याचे विशेष कौतुक करून यापुढेही त्याने दरवर्षी रमज़ान महिन्याचे रोज़े आणि इतर शैक्षणिक बाबी अशाच प्रकारे सातत्याने पूर्ण करत राहावे असे शुभ आशीर्वाद दिले.

## वडवणीत प्रभु श्रीरामाच्या भव्य शोभायात्रेची जय्यत तयारी

वडवणी दि २२ (प्रतिनिधी)-प्रभू श्रीरामचंद्र जन्मोत्सव निमित्त वडवणी शहरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले, २६ मार्च २०२६ रोजी विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि पारंपारिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही या सोहळ्यासाठी शहरातील तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असून सकल हिंदू समाज बांधव आयोजकांकडून जय्यत तयारी सुरू आहे.या कार्यक्रमाची सुरुवात सकाळी ९ वाजता श्रीराम मंदिर येथून भव्य मोटारसायकल रॅलीने होणार आहे. युवकांच्या सहभागातून काढण्यात येणारी ही रॅली छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत जाणार असून शहरात भक्ती व उत्साहाचे वातावरण निर्माण करणार आहे. भगवे झेंडे, घोषणाबाजी आणि शिस्तबद्ध मिरवणूक हे या रॅलीचे वैशिष्ट्य असणार आहे. यानंतर सकाळी १० ते दुपारी १२ या वेळेत कीर्तनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. त्यानंतर पालखी मिरवणूक होणार आहे, कीर्तनाच्या माध्यमातून प्रभु श्रीरामांच्या जीवनातील आदर्श, धर्म, कर्तव्य आणि भक्ती यांचे महत्त्व भाविकांना पटवून दिले जाणार आहे. कीर्तनानंतर सर्व उपस्थितांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असून मोठ्या प्रमाणावर भाविक या प्रसादाचा लाभ घेणार आहेत. सायंकाळी ४ वाजता श्रीराम मंदिर येथून भव्य शोभायात्रेला सुरुवात होईल. पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि भक्तिमय वातावरणात ही शोभायात्रा छत्रपती शिवाजी महाराज चौकापर्यंत



काढण्यात येणार आहे. शोभायात्रेत विविध पथकांचा सहभाग असणार असून महाकाली पथक, अघोरी पथक आणि 'नटराज' पथक विशेष आकर्षण ठरणार आहेत.याशिवाय शोभायात्रेत आदियोगी, प्रभु श्रीराम, महाबली हनुमान तसेच नरसिंह अवतार यांचे जिवंत देखावे सादर करण्यात येणार आहेत. या देखाव्यांमुळे धार्मिक परंपरा आणि भारतीय संस्कृतीचे दर्शन घडणार असून लहानांपासून ते मोठ्यांपर्यंत सर्वांमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे. श्री लक्ष्मी बॅन्डच्या सुरेल वादनामुळे संपूर्ण वातावरण अधिकच भक्तिमय व उत्साही होणार आहे. शहरातील प्रमुख मार्गांवर सजावट, प्रकाशयोजना तसेच स्वागत कमानी उभारण्यात येत असून शोभायात्रेचा मार्ग आकर्षक पद्धतीने सजवण्यात येत आहे. भाविकांच्या सोयीसाठी विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, वैद्यकीय मदत तसेच स्वयंसेवकांची नियुक्ती करण्यात आली आहे. सुरक्षेच्या दृष्टीनेही विशेष नियोजन करण्यात आले असून प्रशासन व आयोजक यांच्यात समन्वय ठेवण्यात येत आहे.

प्रभु श्रीरामाच्या या भव्य सोहळ्याच्या निमित्ताने शहरातील सर्व समाजघटक एकत्र येत असून एकात्मतेचा संदेश देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. भक्तिमय वातावरणात सहभागी होत संस्कृतीचे जतन करण्यासाठी ही एक उत्तम संधी असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे.

या मंगलप्रसंगी सर्व नागरिकांनी सहकुटुंब उपस्थित राहून शोभायात्रेत सहभागी व्हावे आणि कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन श्रीराम मंदिर देवस्थान , सकल हिंदू समाज बांधव व आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## रामनवमीच्या पार्श्वभूमीवर सावळाराम मंदिर श्री वैद्यनाथ भक्ती मंडळाने केली स्वच्छता

परळी दि २२ (प्रतिनिधी)- परळी शहरातील गणेशपार भागातील तीनशे वर्षांची परंपरा असलेल्या सावळाराम मंदिरात रामनवमीच्या पार्श्वभूमीवर श्री वैद्यनाथ भक्ती मंडळाच्या स्वंयसेवकांनी रविवार दि.२२ मार्च रोजी स्वच्छता मोहिम राबवत संपूर्ण मंदिर चकचकीत केले. परळीतील सावळाराम,गोराराम,काळाराम या तिन्ही मंदिरात रामनवमी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.दि.२६ मार्च रोजी रामनवमी असुन या पार्श्वभूमीवर श्री वैद्यनाथ भक्ती मंडळाकडुन रविवार दि.२२ रोजी सकाळी दोन तास सावळाराम मंदिराची स्वच्छता मोहिम केली.यावेळी सावळाराम मंदिराविषयी माहिती देताना नगरसेवक अश्विन मोगरकर यांनी सांगितले की,रामरक्षा पहिल्या श्लोकाप्रमाणे तीनशे वर्षापुर्वी संन्याशी असलेल्या वामन स्वामी यांनी या सावळाराम मंदिरातील मुर्तीची स्थापना केलेली आहे.रामाच्या डाव्या मांडीवर सिता व समोर हनुमान अशी आकर्षक मुर्ती या मंदिरात आहे.यावेळी मंदिराचे पुजारी विजय जोशी यांनी स्वयंसेवकांचे स्वागत केले.स्वच्छता मोहिम झाल्यानंतर इस्कॉनचे प्रचारक ह.भ.प.गुट्टे महाराज यांनी श्रमदानाविषयी मार्गदर्शन केले.यावेळी श्री वैद्यनाथ भक्ती मंडळाचे ओम मिरकले,नवनाथ लोभे,दीपक जोशी,मोहन डापकर,कुणाल चाटे,शौनक चौधरी,ऋषभ कांबळे,गणेश बदणे,चैतन्य तेलंग,धीरज चौधरी,कैलास गौड,हर्षद काळे,रुद्र पुजारी,रुद्र कराड,ओंकार चौहान आदी स्वंयसेवक उपस्थित होते.

# संपादकीय

## जरा याद करो कुर्बानी

दीडशे ते दोनशे वर्ष इंग्रजांच्या पारतंत्र्यात असणाऱ्या भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी हजारो स्वातंत्र्य सैनिकांनी स्वतःच्या जीवाचे बलिदान दिले. अनेक जण फासावर चढले तर कित्येकांनी इंग्रजांच्या गोळ्या छातीवर झेलल्या. या वीर स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत माता इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त झाली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी छातीवर गोळ्या झेलल्या तर अनेक स्वातंत्र्य सैनिक हसत हसत फासावर चढले. भगत सिंग, राजगुरू आणि सुखदेव हे स्वातंत्र्य सैनिक देखील भारत मातेला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हसत हसत फासावर चढले आणि शहीद झाले. देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी आपल्या जीवाची बाजी लावणारे स्वातंत्र्य सैनिक शहीद भगतसिंग, राजगुरु व सुखदेव यांना २३ मार्च १९३१ रोजी इंग्रजांनी फाशी दिली होती. आज २३ मार्च हा दिवस शहीदांच्या नावे कोरला गेला गेला आहे. आजच्याच दिवशी म्हणजे २३ मार्च १९३१ रोजी शहीद भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांनी देशाच्या स्वातंत्र्यासाठी स्वतःच्या प्राणाचे बलिदान दिले. ९५ वर्षांपूर्वी आजच्याच दिवशी इंग्रजांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी दिली होती. देशासाठी प्राणाची आहुती देणाऱ्या शहिदांना आदरांजली वाहण्यासाठी आजचा दिवस संपूर्ण देशात शहीद दिवस म्हणून साजरा केला जातो. १९२८ मध्ये सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले होते. या कमिशनला विरोध म्हणून लाला लजपतराय यांनी मोठा मोर्चा काढला होता. सायमन कमिशनला विरोध करणाऱ्या लाला लजपतराय यांच्यावर इंग्रजांनी लाठीहल्ला केला. या लाठी हल्ल्यात लाला लजपतराय गंभीर जखमी झाले त्यातच त्यांचा मृत्यू झाला. लाला लजपतराय यांच्या मृत्यूनंतर संपूर्ण देशात इंग्रजांविरुद्ध संतापाची लाट उसळली. लाला लजपतराय यांच्या मृत्युनंतर देशातील जहाल गटाचे स्वातंत्र्य सैनिक कमालीचे चिडले. चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, राजगुरु, सुखदेव आणि अन्य जहाल क्रांतिकारकांनी लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्याची शपथ घेतली. लाला लजपतराय यांच्या मृत्यूच्या एक महिन्याच्या आतच या क्रांतिकारकांनी आपली शपथ पूर्ण केली आणि १७ डिसेंबर १९२८ रोजी ब्रिटिश अधिकारी सँडर्सला गोळ्या घालून ठार केले. काही काळ ते भूमिगत राहिले मात्र फितुरीमुळे ते पोलिसांच्या हाती लागले. ७ ऑक्टोबर १९३० रोजी इंग्लिश कोर्टाने भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशीची शिक्षा सुनावली. यानंतर भगतसिंग यांची शिक्षा कमी व्हावी यासाठी फेर याचिका दाखल करण्यात आली मात्र १० मार्च १९३१ रोजी ती याचिका कोर्टाने फेटाळली. २३ मार्च हा दिवस भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांच्या फाशीसाठी निश्चित करण्यात आला. २३ मार्च १९३१ रोजी सकाळी ७ वाजून ३३ मिनिटांनी भगतसिंग, राजगुरु आणि सुखदेव यांना फाशी देण्यात आली. फाशीच्या वेळी या तिघांनी मेरा रंग दे बसंती चोला ...... हे गाणे गायले. फासावर लटकतानाही भारत मातेच्या या सुपुत्रांच्या चेहऱ्यावर कसल्याही प्रकारचे दुःख किंवा पश्चाताप नव्हता उलट भारत मातेसाठी फासावर जात असल्याचा अभिमान होता. आजच्या दिवशी भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतूम मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या क्रांतिकारकांच्या बलिदानाचे स्मरण करणे हे प्रत्येक भारतीयांचे कर्तव्य आहे. भारत मातेला इंग्रजांच्या गुलामीतून मुक्त करण्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या असंख्य ज्ञात अज्ञात शहिदांना शहिद दिनी विनम्र अभिवादन!

# जिल्हा परिषद अध्यक्षपदासाठी साताऱ्यात आमदारातील गँगवार

अशोक खरात प्रकरणामुळे सातारा जिल्हा परिषदेत जे घडलंय त्याकडे महाराष्ट्राने दुर्लक्ष करू नये. सत्तेसाठीचं हे गँगवॉर यशवंतराव चव्हाणांच्या जिल्ह्याची बेअब्रू करणारं आहे. काल अध्यक्षपदासाठी निवडणूक होती. राष्ट्रवादी आणि शिवसेनेची निवडणूकपूर्व युती होती. दोघांचे मिळून ३५ सदस्य निवडून आले. भाजपचे २७ होते. पण भाजपला कुठल्याही परिस्थितीत अध्यक्षपद हवे होते.एका बाजूला मंत्री शंभुराज देसाई, मकरंद पाटील आणि दुसऱ्या बाजूला शिवेंद्रराजे आणि जयकुमार गोरे.दोन्ही बाजूचे सदस्य गेले महिनाभर अज्ञातस्थळी होते. भाजपने पूर्ण ताकद लावली. पोलिस आणि प्रशासनं तर लाज आणली, असं स्थानिक पत्रकार ज्यांनी हे उघड्या डोळ्यांनी पाहिले ते सांगतायत.सदस्य चौथ्या मजल्यावर आणण्यासाठी मंत्री शंभूराज देसाई आणि मकरंद पाटील यांना अक्षरशः जीव पणाला लावावा लागला. एनसीपीच्या दोन सदस्यांच्या नातेवाईकांना हाताशी धरून ते गायब असल्याची तक्रार आधीच केली गेली असा आरोप आहे.जे सदस्य गायब आहेत अशी तक्रार होती, ते दिसताच १०-१५ पोलिस त्याला पकडायला धावले. हात-पाय धरून ओढत होते. शंभूराजे आणि मकरंद पाटील त्यांना सभागृहात नेण्यासाठी धडपडत होते. पोलिस थेट मंत्र्यांच्या






अंगावर धावून गेले. झटापटीत पालकमंत्री शंभूराजे देसाई जखमी झाले. हाताला जखम झाली, रक्तस्त्राव सुरू झाला. ज्या सदस्याला ओढत नेला त्याचे कपडे फाटले. एका कॅबिनेट मंत्र्याने तर थेट सदस्यांच्या कॉलरला धरून दमदाटी करत, परिणाम वाईट होतील अशी धमकी दिल्याचे स्थानिक पत्रकार सांगतायत.अखेर भाजपचा अध्यक्ष झाला कोण ?? तर शिंदेंच्या शिवसेनेचे आमदार महेश शिंदे यांच्या पत्नी. कारण त्यांनी भाजपकडून निवडणूक लढली होती.केंद्रात, राज्यात सगळीकडे भाजप-शिनसेनेची युती आहे. पण एका जिल्हा परिषदेसाठी दोन पक्षात अक्षरशः गँगवॉर सारखी स्थिती झाली. मंत्र्यांच्या अंगावर पोलिस धावले, कैबिनेट मंत्री दमदाटी करत चक्क गुंडासारखं वर्तन करत होते, हे तिथे हा सगळा प्रसंग पाहणारे सांगतायत. तीनही पक्ष सत्तेतील, चारही मंत्री उद्या कॅबिनेटला मांडीला मांडी लावून बसतील.पण यशवंतराव चव्हाणांच्या राजकारणा ची परंपरा असलेल्या साताऱ्यात जिल्हा परिषदेत इलेक्शनमधे जे झाले ते बघून कृष्णेचा काठ हळहळला असेल.(फेसबुक वरून साभार)

# थायलंड, बांगलादेश संशोधकांच्या उपस्थितीत दहिफळ येथे आंतरराष्ट्रीय परिषद संपन्न

बीड दि २२(प्रतिनिधी)- शाम गदळे कला व विज्ञान महाविद्यालय, दहिफळ (वडमाउली) येथे जागतिक महिला दिनानिमित्त 'प्राचीन शहाणपण ते डिजिटल शक्ती: वेळ आणि तंत्रज्ञानाला आकार देणाऱ्या स्त्रिया' या विषयावर एक दिवसीय ऑनलाईन आंतरराष्ट्रीय परिषद उत्साहात पार पडली. या परिषदेत भारत, थायलंड आणि बांगलादेशातील नामवंत संशोधकांनी सहभाग नोंदवला.

श्री वडमाउली विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ. शशिकांत दहिफळकर आणि सचिव शरदबप्पा गदळे यांची विशेष उपस्थिती होती. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याच्या संस्थेच्या ध्येयाचा हा एक भाग असल्याचे यावेळी अधोरेखित करण्यात आले.परिषदेच्या निमंत्रक अभ्यासक डॉ. शांता जाधवर (गिते) यांनी प्रास्ताविक केलेपरिषदेचे उद्घाटन संस्थेच्या कोषाध्यक्षा डॉ. शालिनीताई कराड यांच्या हस्ते झाले. बिजभाषणात हेरिटेज फाउंडेशनचे संचालक (भारत, अमेरिका, थायलंड आणि दक्षिण कोरिया) भुजंग रामराव बोबडे यांनी प्राचीन ज्ञान जपण्यात आणि तंत्रज्ञानाच्या प्रकटीकरणात स्त्रियांची भूमिका किती महत्त्वाची आहे, यावर प्रकाश टाकला.थायलंडमधून: चुलालॉन्गकॉर्न युनिव्हर्सिटी, बँकॉक येथील अभ्यासक वैष्णवी सिंग यांनी 'थाई परंपरेतील भारताची मुळे आणि त्यातील स्त्रियांचे योगदान' या विषयावर मांडणी केली. बांगलादेशमधून: ढाका विद्यापीठाच्या अभ्यासक नसरीन जहाँ खुशी यांनी 'वस्त्रोद्योगाचा वारसा आणि स्त्रियांचे योगदान' यावर सविस्तर मार्गदर्शन केले.समारोप प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून के.एस.के. कॉलेजच्या उपप्राचार्या डॉ. अनिता शिंदे उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षपद प्रभारी प्राचार्य प्रो. अनंत मुंडे यांनी भूषवले. या संपूर्ण कार्यक्रमाचे नेटके सूत्रसंचालन डॉ. अंजली वाघमारे यांनी केले, तर परिषदेच्या समन्व्यक डॉ. शांता जाधवर यांनी उपस्थितांचे आभार मानले.ही परिषद यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# डॉ.सुधीरचंद्र कदम यांना पुत्रशोक

## उच्च विद्याविभूषित सिद्धहस्त सर्जन डॉ.समीर कदम यांचे निधन

मुंबई दि.२२(प्रतिनिधी):- एमजीएम संस्थेचे विश्वस्त तथा एमजीएम हेल्थ



सायन्सेस आणि एमजीएम हॉस्पिटल तसेच वैद्यकीय महाविद्यालय नवी -मुंबईचे संचालक अधिष्ठाता डॉ.सुधीरचंद्र नानासाहेब कदम यांचे सुविद्य पुत्र सिद्धहस्त शल्यविशारद डॉ.समीर सुधीरचंद्र कदम यांचे अल्पशा आजाराने आज रविवार दि.२२ मार्च २०२६ रोजी मुंबई येथे दुःखद निधन झाले आहे.ते ४८ वर्षांचे होते.त्यांचे चुलते तथा एमजीएमचे अध्यक्ष माजी शिक्षणमंत्री श्री.कमलकिशोर कदम यांनी डॉ.समीर कदम यांच्या निधनाबद्दल शोक प्रकट केला असून,ते एक उच्च विद्याविभूषित,मितभाषी,सुस्वभावी,असे अधिव्याख्याता तसेच कुशल आणि निष्णात शल्यविशारद होते असे म्हटले आहे.डॉ.समीर यांचे जेष्ठ चुलते तथा एमजीएमचे सचिव आणि एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम यांनी देखील या अनपेक्षित घटनेमुळे व्यक्तिशः मला,संबंध कदम परिवाराला,तसेच आमचे कनिष्ठ बंधू आणि डॉ.सुधीरचंद्र यांना मोठा धक्का बसला आहे.

# विद्यार्थ्याचा अभिमानास्पद यश: यशवंत डोणे एमटीएस परीक्षेत उज्ज्वल कामगिरी

माजलगाव दि.२२ (प्रतिनिधी) :- शहरातील श्री सिद्धेश्वर विद्यालयाचा सहावी इयत्तेत शिकणारा विद्यार्थी यशवंत मुकुंद डोणे याने एमटीएस परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. जळगाव येथे आयोजित करण्यात आलेल्या या परीक्षेत यशवंतने संपूर्ण महाराष्ट्रातून २६ वा क्रमांक मिळवला असून बीड जिल्ह्यात चौथा तर माजलगाव तालुक्यात प्रथम क्रमांक पटकावला आहे.



अत्यंत लहान वयात मिळवलेले हे यश त्याच्या मेहनतीचे, चिकाटीचे आणि अभ्यासातील सातत्याचे प्रतीक आहे. यशवंतच्या या यशामुळे त्याच्या कुटुंबासह शाळेचे नावही उज्ज्वल झाले आहे.त्याच्या या कामगिरीबद्दल शिक्षक, पालक आणि परिसरातील नागरिकांकडून त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. यापुढेही यशवंतने अशीच प्रगती करत राहावी आणि भविष्यात मोठे यश संपादन करावे, अशी शुभेच्छा सर्वांकडून व्यक्त होत आहेत.

# जागतिक वन दिनानिमित्त पिंपळवंडी वनपरिक्षेत्रात वृक्षारोपण करुन वनसंपदा रक्षणाची घेतली शपथ




पिंपळवंडी दि.२२(प्रतिनिधी) - वनपरिक्षेत्र कार्यालय पाटोदा अंतर्गत पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथे शनिवार दि.२१ मार्च २०२६ रोजी जागतिक वन दिनानिमित्त येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग परिसरा जवळील रोपवाटिका क्षेत्रात वनविभागाचे अधिकारी,कर्मचारी,ग्रामस्थ व पत्रकारांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून वनसंपदेची रक्षण करण्याची शपथ घेऊन जागतिक वन दिन साजरा करण्यात आला.ए.बी.गर्कळ विभागीय अधिकारी बीड यांच्या आदेशाप्रमाणे ए.ए.घोडके वनपरिक्षेत्र अधिकारी पाटोदा यांच्या मार्गदर्शनात जागतिक वन दिनाचे आयोजन केले होते.२१ मार्च जागतिक वन दिन वृक्षारोपण आणि वन संवर्धन हे केवळ शासकीय स्तरावर मर्यादित न राहता ती लोकचळवळ बनणे आवश्यक आहे. यानिमित्त वनसंपदेची रक्षण करण्याची उपस्थितांनी शपथ घेतली.मी आपल्या अमूल्य वनसंपदेचे रक्षण करेन.जंगलांना लागणाऱ्या आगीपासून वणवा वाचविण्या साठी मी पूर्ण प्रयत्न करेन.मी स्वतः जंगलात आग लावणार नाही आणि इतरांनाही आग लावण्यापासून रोखेण. वनव्याची माहिती मिळताच मी त्वरित वन विभागाला कळवेन.आणि आग विजविण्यासाठी शक्य ती मदत करेल.माझी जंगले माझे भविष्य,अग्निमुक्त वन हीच माझी जबाबदारी या शपथेप्रमाणे प्रत्येक व्यक्तीने जबाबदारीने कर्तव्य बजावले.तर वनराईचे रक्षण होण्यास मदत होईल.या कार्यक्रमाला अजय देवगुडे वनपाल पाटोदा, वनरक्षक एम.के.काकडे,संदीप राठोड,जी.बी. सानप,श्रीमती एस.एस.पवार, पत्रकार बबनराव उकांडे,भाऊसाहेब पवार, चंद्रकांत पवार,वनमजूर सातपुते, सोपान येवले,शेख सत्तार,अंबादास लवांडे,शहादेव पवार,पोपट गुजर, शामराव देवकर,सुभाष नागरगोजे, विजय जाधव,गर्जे तसेच महिला कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

# घरकुल लाभार्थ्यांना मिळतेय मोफत वाळु ;अनिलराधे कांबळे यांनी केलेल्या पावसातील आंदोलनास यश

## लाभार्थ्यांनी मानले अनिलराधेंचे आभार

माजलगाव दि २२ (प्रतिनिधी)- घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळु मिळावी यासाठी उपसरपंच तथा सामाजिक कार्यकर्ते अनिलराधे कांबळे यांनी तहसिल कार्यालया समोर भर पावसात आंदोलन केले होते तर याप्रश्नी सतत पाठपुरावा केल्याने दखल प्रशासनाने घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळु देण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे लाभार्थ्यांना दिलासा मिळाला असुन अनेक लाभार्थ्यांनी आंदोलक अनिलराधे कांबळे यांचे आभार मानले आहे. येथील सामाजिक कार्यकर्ते अनिलराधे कांबळे यांनी घरकुल लाभार्थ्यांच्या वाळुप्रश्नावर शासनाचे लक्ष वेधुन घेण्यासाठी भर पावसात आंदोलन केले होते, तर महसुलमंत्र्यांची भेट घेत मोफत वाळु धोरण फक्त कागदोपत्री न राबविता त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी करावी अशी आग्रही मागणी केली होती. तसेच या प्रश्नावर सातत्याने शासनदरबारी पाठपुरावा देखिल केला होता. त्यामुळे याप्रकरणी शासनाने दखल घेत ब्रम्हगावसह अनेक ठिकाणी पात्र घरकुल लाभार्थ्यांना मोफत वाळु देण्यास सुरूवात केली आहे. त्यामुळे अडगळीत पडलेल्या, थांबलेल्या बांधकामांना वाळुमुळे वेग आला आहे. अनेक सर्वसामान्यांच्या घराचे स्वप्न पुर्ण होण्यास मदत मिळत असल्याने घरकुल लाभार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. दरम्यान वाळु प्रश्नी शासनदरबारी आवाज उठवुन लाभार्थ्यांना न्याय मिळवुन दिल्याबद्दल अनेक घरकुल लाभार्थ्यांनी आंदोलक अनिलराधे कांबळे यांचे आभार मानले आहेत.

# लिंबागणेश येथे महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी एनसीएमसी (बस पास) कार्ड नोंदणी शिबिर



लिंबागणेश दि.२२(प्रतिनिधी)- राज्य परिवहन महामंडळाने एसटी प्रवासातील सवलतींसाठी डिजिटल स्मार्ट कार्ड प्रणाली लागू करण्याचा निर्णय घेतला असून, एनसीएमसी कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर बीड तालुक्यातील लिंबागणेश येथे रविवार दि.२२ मार्च रोजी महिला व ज्येष्ठ नागरिकांसाठी सवलतीच्या दरात नोंदणी शिबिर उत्साहात संपन्न झाले.

सध्या महामंडळाकडून महिलांना अर्धे तिकीट, ७५ वर्षांवरील ज्येष्ठ नागरिकांना मोफत प्रवास, तसेच स्वातंत्र्यसैनिक, राज्य पुरस्कार प्राप्त व्यक्ती, विद्यार्थी व दिव्यांग नागरिकांना विविध सवलती दिल्या जातात. मात्र या सवलतींचा लाभ घेण्यासाठी एनसीएमसी स्मार्ट कार्ड आवश्यक करण्यात आले आहे. कार्ड अनिवार्य झाल्याच्या चर्चेमुळे अनेक ज्येष्ठ नागरिक, महिला व दिव्यांग व्यक्ती बसस्थानकांवर रांगा लावत असल्याचे चित्र दिसत आहे. ही धावपळ टाळण्यासाठी लिंबागणेश येथील मारोती मंदिरात सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत शिबिर आयोजित करण्यात आले .महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाकडून एनसीएमसी कार्ड सक्तीचे करण्यात आल्याने सवलत धारकांमध्ये अस्वस्थता निर्माण झाली आहे. उन्हातान्हात बसस्थानकांवर रांगा लावण्याची वेळ येत असून, गावोगावी अशा शिबिरांचे आयोजन झाल्यास नागरिकांची मोठी सोय होणार आहे. त्यामुळे महिला व ज्येष्ठ नागरिकांनी अशा शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. गणेश ढवळे यांनी केले आहे.

# गेवराई येथील सह्याद्री क्लासेसच्या तीन विद्यार्थ्यांचे नवोदय परिक्षेत घवघवीत यश

गेवराई दि.२२ (बापू गाडेकर) :- शहरातील सह्याद्री क्लासेसने दरवर्षीप्रमाणे यंदाच्या नवोदय प्रवेश परीक्षेतही उल्लेखनीय यश संपादन करत आपली शैक्षणिक गुणवत्ता पुन्हा एकदा सिध्द केली आहे. नवोदय विद्यालयासाठी घेतल्या जाणाऱ्या या स्पर्धात्मक परिक्षेत सह्याद्री क्लासेसच्या तीन विद्यार्थ्यांची नवोदयसाठी निवड झाली असून या निवडीबद्दल क्लासेसचे व विद्यार्थ्यांचे अनेकांनी कौतुक करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत. यामध्ये अंशवे शिंदे, फलके आरूष आणि बंडे रियांश या विद्यार्थ्यांनी यश मिळवत क्लासेसचे नाव उज्ज्वल केले आहे. या यशामुळे सह्याद्री क्लासेसची सातत्यपूर्ण प्रगती पुन्हा एकदा अधोरेखित झाली असून आतापर्यंत या क्लासेसच्या ३० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांनी नवोदय परीक्षेत यश संपादन केले आहे. फक्त नवोदयच नव्हे तर इयत्ता ५ वी व ८ वीच्या शिष्यवृत्ती परीक्षेतही या क्लासेसने भरीव यश मिळवले आहे. आतापर्यंत १५० पेक्षा अधिक विद्यार्थी या परीक्षेत पात्र ठरले आहेत.



तसेच एनएमएमएस परीक्षेतही सह्याद्री क्लासेसने उल्लेखनीय कामगिरी करत ४० पेक्षा अधिक विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले आहेत. या विद्यार्थ्यांना शासनाकडून प्रत्येकी ५६ हजार रूपयांची शिष्यवृत्ती मिळाल्यामुळे त्यांच्या शिक्षणाला मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. या यशामागे क्लासेसचे संचालक राजेंद्र वाघ सर (नवोदय व स्कॉलरशिप मार्गदर्शक) आणि दत्ता भोसले सर यांचे मार्गदर्शन तसेच शिक्षक अनिल चव्हाण सर, सुरेखा मॅडम व सुशांत सर यांचे अथक परिश्रम मोलाचे ठरले आहेत. भविष्यातही अशाच प्रकारे गुणवंत विद्यार्थी घडवण्याचा निर्धार संचालक राजेंद्र वाघ यांनी व्यक्त केला आहे.

# इराणच्या निर्णयाने अमेरिकेला मोठा धक्का

नवि दिल्ली- गेल्या २० दिवसांपासून अमेरिका-इस्त्रायल आणि इराणमध्ये युद्ध सुरू आहे. अमेरिका-इस्त्रायल हे संयुक्तपणे इराणवर दररोज हल्ले करत आहेत. या हल्ल्यात आतापर्यंत इराणच्या अनेक मोठ्या नेत्यांसह लष्करी अधिकाऱ्यांचा मृत्यू झाला. मात्र, तरीही इराणने माघार घेतलेली नसून इराणही अमेरिका-इस्त्रायलवर जोरदार प्रतिहल्ले करत आहे. या युद्धामुळे जगभरात ऊर्जा पुरवण्यासाठी महत्त्वाचा असलेला जलमार्ग म्हणजे होर्मुझच्या सामुद्रधुनीमध्येही तणाव आहे. त्यामुळे कच्च्या तेलाचा व्यापार ठप्प होण्याच्या मार्गावर असल्याने जगातील अनेक देशांना याचा मोठ्या प्रमाणात फटका बसत आहे. या पार्श्वभूमीवरून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणला मोठा इशारा देत येत्या ४८ तासांत ही सामुद्रधुनी खुली करण्याची धमकी दिली होती. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या धमकीनंतर इराणने सामुद्रधुनी खुली करण्याबाबत एक निर्णय घेतला. मात्र, हा निर्णय घेत असताना अमेरिकेला मोठा धक्का दिला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी आता शत्रू देश (अमेरिका-इस्त्रायल) वगळता सर्वांसाठी खुली करण्याची घोषणा इराणने केली आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांना जाऊ देण्याबाबत आता इराणने नरमाईची भूमिका घेतल्याचं दिसून येत आहे. या संदर्भातील वृत्त इंडिया टुडेनी दिलं आहे.

# मुंबईत वॉटर मेट्रो येणार ?

मुंबई- मुंबई महानगर प्रदेशात (चचठ) नव्या वाहतूक पर्यायाची चर्चा सध्या जोरात रंगली आहे. सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या एका पोस्टनुसार, मुंबईत लवकरच 'वॉटर मेट्रो' सुरू होऊ शकते. या प्रकल्पाअंतर्गत ३४० किलोमीटर लांबीचे जाळे आणि ३६ मार्ग प्रस्तावित असल्याचा दावा करण्यात आला आहे. यामध्ये कल्याण ते गेटवे ऑफ इंडिया हा महत्त्वाचा मार्ग असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.व्हायरल पोस्टनुसार, या वॉटर मेट्रोसाठी सुरुवातीला युरोपमधून इलेक्ट्रिक फेरी बोटी आणल्या जाणार आहेत. तसेच या प्रकल्पाचा पहिला टप्पा डिसेंबर २०२६ पर्यंत सुरू होऊ शकतो, असा दावा करण्यात आला आहे. मात्र, या मार्गांबाबत आणि वेळापत्रकाबाबत अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नाही.

## २३ मार्च शहीद दिवस

# जो शहीद हुए हैं उनकी जरा याद रखो कुर्बानी




आज शहीदांच्या पुंण्यायीनेच देशाची १४० कोटी जनता खुला स्वास घेत आहे.अनेकक्रांतिकारक,थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने,प्रयत्नाने व बलिदानाने १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली.१९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले.त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन ''सायमन परत जा''च्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला.ही बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही.लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले.यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली. जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला.यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांचा अंत झाला.त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारतात शोककळा पसरली. हे दु:ख भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांना पाहवले नाही. त्यामुळे क्रांतिकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी दृढनिश्चय करून व्युहरचना तयार केली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा इंग्रज अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याचे ठरविले.लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी भगतसिंग,राजगुरू आणि सुखदेव हे तिघेही वेष बदलुन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले.सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले. संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथुन पलायन केले.यामुळे इंग्रज आगबबुला झाले व इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले.बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली. यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली.भारत स्वतंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही कधीही विसरणार नाही.''जो पर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोणीही विसरणार नाही''. भगतसिंग राजगुरू आणि सुखदेव यांचे बलीदान पाहून १४० कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते.परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशसेवा, सामाजिक सेवा व देशांच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात.राजकीय पुढाऱ्यांनो याद राखा जोपर्यंत तुम्ही देशाच्या विकासासाठी, जनतेच्या हितासाठी, गोरगरिबांच्या कल्याणासाठी संपूर्णपणे ताकद लावणार नाही तोपर्यंत शहिदांच्या आत्म्याला शांती मिळणार नाही व त्यांना राजकीय दृष्ट्या खरी श्रद्धांजली म्हणता येणार नाही. क्रांतिकारक,शहिद हसत-हसत फासावर का चढले यामागचा त्यांचा एकच उद्देश होता.तो म्हणजे मातृ भुमिची रक्षा करून सर्वसामान्यांना न्याय मिळावा व भारत स्वतंत्र होवून सुख शांती निर्माण व्हावी आणि देश सुजलाम सुफलाम व्हावा.परंतु आजचा राजकीय पुढारी असा झाला आहे की ''लोका सांगे ग्याण व स्वत: कोरडे पाषाण'' यामुळेच या कृषी प्रधान देशात मुठभर राजकीय पुढारी भ्रष्टाचाराच्या मार्गाने करोडपती झाल्याचे दिसून येतात व करोडपती शेतकरी शुन्य झालेला दिसुन येतो.कारण आजचा राजकीय पुढारी पाच वर्षासाठी लोकप्रतिनिधी बनतो खरा परंतु पाच वर्षाच्या काळात करोडपती बनतो ही कसली देश सेवा,कसली देश भक्ती म्हणावी!भारतात अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब, सर्वसामान्य,शेतकरी हा गरीबीच्या खाईत जात आहे.या संपूर्ण बाबींची जान राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली समजल्या जाईल.राजकीय पुढाऱ्यांना कोणत्याही लढाईवर जाण्याची गरज नाही.फक्त शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी,जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा व लोककल्याणाची कामे केली पाहिजे. तेंव्हाच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व शहिदांच्या आत्म्याला शांती मिळेल.संपुर्ण देश शहिद दिनाला शहिदांना आपली आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलीदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे.राजकीय पुढाऱ्यांनो थोडे ७९ वर्षे मागे वळून पहा व क्रांतिकारकांना देश स्वातंत्र्यासाठी कायकाय यातना भोगाव्या लागल्यात याचे अनुकरण करून चिंतन करा आणि त्यांच्या पावलावर पाऊल ठेवून समाजसेवा करण्याची तत्परता दाखवा.शहिद दिनाच्या निमित्ताने देशवासीयांना हेच सांगु इच्छितो की बदलत्या हवामानामुळे व युद्धजन्य परिस्थितीमुळे देशातील वाढते प्रदुषण धोकादायक स्थितीत येवून ठेपले आहे आणि प्रदूषणाच्या बाबतीत जगामध्ये भारताचा तिसरा क्रमांक लागतो.याकरीता शहिद दिनाचे औचित्य साधून राजकीय पुढारी, सामाजिक संघटना व सर्वसामान्य नागरिकांनी आपल्यापरीने वृक्षारोपण करून जास्तीत जास्त वृक्षलागवड करण्याचा संकल्प केला पाहिजे हीच शहिदांना खरी श्रद्धांजली ठरेल व हे वृक्ष अनंत काळापर्यंत आपल्या स्मरणात राहील आणि शहिदांचे स्मरण आपल्याला प्रत्येक झाडाच्या पानात, फुलात,फळात दिसुन येईल.हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम ''जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा''जय हिंद! जय भारत.

– लेखक –
**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
नागपूर मो.नं.९९२१६९०७७९

# पाटोदा तालुक्यात गॅसचा तुटवडा

## ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त; आंदोलनाचा इशारा

**पाटोदा दि २२ (प्रतिनिधी) : पाटोदा तालुक्यातील ग्रामीण भागात सध्या घरगुती गॅसचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्याने सर्वसामान्य नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. अनेक गावांमध्ये दहा-दहा दिवस गॅस वितरणाची गाडी फिरकत नसल्याने नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले गॅस वितरण व्यवस्था सुधारित करावी नसता आंदोलन करू असा इशारा ग्रामीण भागातील जनता देत आहे**




नागरिकांच्या म्हणण्यानुसार, गॅस टाकी वेळेवर बुक होत नाही. काही वेळा बुकिंग करण्याचा प्रयत्न केला असता ''आधीच बुकिंग केलेले आहे'' असा संदेश दाखवला जातो. तर काही प्रकरणांमध्ये गॅस टाकी बुक न करताही ''गॅस टाकी उचलली'' असे नोंदीत दाखवले जात असल्याची गंभीर बाब समोर आली आहे. त्यामुळे ग्राहकांना आर्थिक फटका बसत असून, यामागे गैरव्यवहार होत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ग्रामीण भागातील महिलांना विशेषतः स्वयंपाकासाठी मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. पर्यायी इंधनाचा वापर करावा लागत असल्याने अतिरिक्त खर्च आणि त्रास वाढला आहे.दरम्यान, गॅसचा कृत्रिम तुटवडा निर्माण करून भ्रष्टाचार होत असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. या सर्व प्रकाराची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. या पार्श्वभूमीवर पाटोदा तालुक्यातील गॅस धारकांच्या वतीने तहसील कार्यालयावर लवकरच आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे. येत्या सोमवारी संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती नागरिकांनी दिली आहे.

## सोसायटी अचिव्हर्स' इंग्रजी मॅगझिन्सच्या कव्हर पेजवर ना.पंकजाताई मुंडे झळकल्या!

'इथिकल लिडरशीप' अशा शब्दांत राजकीय, सामाजिक प्रवासाचा मॅगझिनने केला गौरव

मुंबई (प्रतिनिधी) : राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री तथा महाराष्ट्रातील धडाडीच्या नेत्या ना. पंकजाताई मुंडे यांची एक विशेष मुलाखत 'सोसायटी अचिव्हर्स' या मुंबईतून प्रकाशित होणा-या सुप्रसिद्ध इंग्रजी मॅग्झिनने घेतली असून कव्हर पेजवर त्यांना स्थान दिले आहे. 'देअर इज नो सबस्टिट्यूट फॉर इथिकल लीडरशीप' अशा शब्दांत त्यांच्या आतापर्यंतच्या राजकीय, सामाजिक प्रवासाचा मासिकाने गौरव केला आहे.

'सोसायटी अचिव्हर्स' मॅग्झिनची एक स्पेशल एडिशन या महिन्यात प्रसिद्ध झाली आहे. या इंग्रजी मासिकाचा देश विदेशात मोठा वाचक वर्ग आहे. ना. पंकजाताई मुंडे यांनी आपल्या धडाकेबाज कामातून राज्याच्या राजकारणात एक वेगळी ओळख निर्माण केली आहे शिवाय काम करण्याची त्यांची एक स्वतःची खास शैली आहे, अतिशय अभ्यासू व तळमळीने काम करणा-या नेत्या म्हणून त्या ओळखल्या जातात. पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री म्हणून काम करत असताना त्यांनी अनेक लोकाभिमुख निर्णय घेतले. एक लोकनेत्या म्हणून त्यांच्या राजकीय व सामाजिक कार्याचा आढावा या मुलाखतीत घेण्यात आला आहे. मॅग्झिनच्या संपादिका न्ड्रेया कोस्टबीर यांनी त्यांची विशेष मुलाखत घेतली आहे. एकूणच त्यांच्या कार्य प्रवासाच्या टप्प्यातील विविध पैलू फोटोच्या माध्यमातूनही उलगडले आहेत. विविध क्षेत्रातील कर्तृत्ववान महिलांच्या देखील मुलाखती या मासिकात घेतल्या गेल्या आहेत.

### यशस्वीतांच्या स्टोरीचा भाग झाल्याचा आनंद

मॅगझिनच्या संपादिका न्ड्रेया कोस्टबीर, अशोक धामणकर यांनी शनिवारी ना.पंकजाताई मुंडे यांची त्यांच्या रामटेक या शासकीय निवासस्थानी भेट घेऊन या स्पेशल एडिशनचे त्यांच्या हस्ते प्रकाशन केले. प्रकाशन झाल्यानंतर माध्यमांशी बोलताना ना. पंकजाताईंनी आनंद व्यक्त केला. त्या म्हणाल्या, सोसायटी अचिव्हर्स मॅग्झिनने त्यांच्या कव्हर स्टोरी ' मध्ये मला स्थान दिले, त्याबद्दल सोसायटी टीमचे आणि विशेषतः अँड्रिया व धामणकर यांचे मनापासून आभार मानते. माझ्या आतापर्यंतच्या प्रवासाची ही झलक नक्की वाचा असे आवाहन त्यांनी वाचकांना केले आहे.

### प.पू.श्री श्री शंकरभारती महास्वामी यडतोरेनीं घेतले

## बीडच्या प्राचिन देवस्थानाचे दर्शन



सुरेश साळुंकेंनी सांगितली जटा शंकर मंदिराची पौराणिक माहिती

बीड (प्रतिनिधी) : भारत विजययात्रेसाठी निघालेल्या श्री योगानन्देश्वर सरस्वती मठ , कृष्णराजनगर म्हैसूरचे मठाधिपती श्री श्री शंकर भारती महास्वामी पिठाधिश्वर यडतोरेंची हे भारत विजययात्रा चालु आहे. दरम्यानच्या काळात बीड शहराच्या श्रीरामनगरी (रविराज मंगल कार्यालय.जुना मोढा) रामनवमीच्या महा पर्वकाळात श्रीराम नवरात्रा आणि श्रीराम नवमी रामत्सोवाचे आयोजन केले आहे. त्यानिमित्ताने १८मार्च ते २८मार्च २०२६ या काळात विविध धार्मिक, अध्यात्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले आहे.दरम्यानच्या काळात प.पू.गु.नि.श्री श्री शंकर भारती महास्वामी यडतोरेनीं बीड शहरातील सुप्रसिद्ध श्री जटाशंकर मंदिर, श्री.कंकालेश्वर मंदिर, श्री खंडेश्वरीदेवी मंदिर आणि श्री खंडोबा मंदिरात जाऊन दर्शन घेतले.तेव्हा श्री जटाशंकर मंदिरात निवेदक सुरेश साळुंके यांनी श्री जटाशंकर मंदिराच्या ठिकाणी अपहरणाच्या वेळी सितामाईच्या संरक्षणार्थ रावणाशी युद्ध करताना जटायू पक्षाचा एक पंख या ठिकाणी पडल्याचे सांगुन जटायु पक्षास पाणी पाजण्यासाठी बाण मारल्याने खोदल्या गेलेल्या विहिरीची माहिती सांगुन बीड शहराच्या भौगोलिक, ऐतिहासिक, पौराणिक आणि धार्मिक माहिती सांगुन श्री कंकालेश्वर मंदिराबाबत हि ज्ञात माहिती सांगितली.परमपूज्य श्री श्री शंकर भारती महास्वामी यडतोरेनीं विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे दिली दरम्यान सोबत संस्कार विद्यालयाचे संस्कृत भाषेचे शिक्षक आणि प्रचारक प्रेरक वैद्य , भागवताचार्य भार्गव जोशी महाराज,प्रा खांदाट,शेखर भोगे गुरूजी, श्रीमती भारती , गोपाळ पुजारी , थीगळेसह श्री शंकर भारती महास्वामी पिठाधिश्वर यडतोरेंचे अनेक शिष्यगण उपस्थित होते.

# संत बंकटस्वामी महाराज गुणवंतांची खाण होते - महंत तुकाराम महाराज भारती

बीड दि २१ (प्रतिनिधी)- वारकरी संप्रदायात संत बंकटस्वामी महाराज यांचे संपादकीय कार्य मोठे आहे. स्वामी महाराज हे गुणवंताची खान होते. त्यांच्यामुळेच आज महाराष्ट्रात वारकरी संप्रदायाचे विस्तारलेले स्वरूप पाहायला मिळते असे प्रतिपादन श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती यांनी केले. बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत सुदाम देव महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त दुसऱ्या दिवसाचे कीर्तन पुष्पगुच्छ बोलत होते यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प श्रीकृष्ण महाराज यादव, श्री ह भ प अच्युत महाराज घोडके, श्री ह भ प दिनेशानंद शास्त्री, बबन महाराज बहिरावळ, भास्कर महाराज शिंदे यांच्यासह हजारो भावीक भक्तांची उपस्थिती होती..



श्रीक्षेत्र नेकनुर येथे संत सुदाम देव महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सव व राम जन्मोत्सवानिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे यात दुसऱ्या दिवसाची कीर्तन पुष्प श्री ह भ प महंत तुकाराम महाराज भारती यांनी अर्पण केले यावेळी त्यांनी संत नामदेव महाराज यांच्या गाथेतील अभंगावर सुंदर चिंतन मांडले.. 'ज्ञानदेव' या नावाचा उच्चार करताच मनातील सर्व 'माया' अज्ञान आणि सांसारिक मोह मुळासकट नष्ट होते.

संतांचा महिमा शब्दांत सांगणे कठीण आहे. जेव्हा गर्विष्ठ चांगदेवांनी वाघावर बसून दर्शन घ्यायला आले, तेव्हा माऊलींनी त्यांच्या अहंकाराचा नाश करण्यासाठी एका 'निर्जीव भिंतीला' सजीव करून चालवून दाखवले. हा त्यांच्या आध्यात्मिक शक्तीचा चमत्कार होता. ज्या सामान्य आणि अज्ञानी जड-मूढ लोकांना समाजाने नाकारले होते, त्यांचा माऊलींनी उद्धार केला.

वारकरी संप्रदायामध्ये संत बंकट स्वामी महाराज यांचे संपादकीय क्षेत्रातील कार्य खूप मोठे आहे. त्यांच्या शिष्य परंपरेमध्ये संत भगवान बाबा, संत सुदाम देव महाराज,संत एकनाथ महाराज पालसिंगणकर अशा शेकडो गुणवंतांची नावे येतात त्यामुळे बंकट स्वामी हे गुणवंतांची खाण होते असेही महाराज म्हणाले. तर आज महंत लक्ष्मण महाराज मेंगडे बाबा ही तोच अध्यात्मिक गुणवंताचा वारसा चालवत आहेत असे महाराज म्हणाले. यावेळी कीर्तनात साथ संगत संत बंकट स्वामी महाराज फडावरील सर्व टाळकरी मंडळी गायक वादक उपस्थित होते.

## जाहिर प्रगटन

सर्व जनतेस या जाहिर प्रगटनाव्दारे कळविण्यात येते की, आमचे अशिल विठ्ठल रामभाऊ वरवडे, रा. काळा हनुमान नगर, वडवणी ता. वडवणी जि. बीड यांनी शरद बळीराम शिंदे रा. वडवणी ता. वडवणी जि.बीड यांचे मालकी व त्याव्यातील शिवार मौजा वडवणी ता. वडवणी जि.बीड व नगर पंचायत वडवणी हद्दीतील जमीन गट नं. ५० एकूण क्षेत्रफळ ०० हे.८८ आर हिस्सापूर्ण पैकी ०० हे. १२.३९ आर जिची चतुःसिमा पुर्वेस: यशवंत भानुदास आळणे यांची जमीन, पश्चिमेस जालिंधर बळीराम शिंदे व शरद बळीराम शिंदे यांची जमीन, दक्षिणेस संपत्त शिंदे यांची जमीन, उत्तरेस १० फुटाचा रस्ता व त्यानंतर विठ्ठल गणपत शिंदे यांची जमीन. या चतु:सिमेच्या आतील मिळकत तदगंभुतवस्तुसह कायम खरेदी करण्याचा ठराव केलेला होता. त्याबाबत मा. दिवाणी न्यायालय (व. स्तर) माजलगाव यांच्या न्यायालयात ठरावाची पुर्तता करुन मिळणे बाबत दावा दाखल केलेला असुन त्याचा स्पे.दि.दा.नं.११/२०२१ असा असुन सदरच्या दाव्या मनाई हुकुम असताना व दावा प्रलंबीत असताना शरद बळीराम शिंदे यांनी सदर मिळकत म.अब्दुल रऊफ जब्बारखान पठाण, अदिल शहानुर कुरेशी व मिरा शरद शिंदे यांना बेकायदेशीर खरेदीखत द.अ.क्र. ५५६/२०२२ दिनांक २१/०६/२०२२ रोजी विक्री करुन दिलेली आहे. सदरचे खरेदीखत हे दावा प्रलंबीत व मनाई हुकुम असताना झालेले आहे.

वरील वर्णनाची मिळकत म. अब्दुल रऊफ जब्बारखान पठाण, अदिल शहानुर कुरेशी व मिरा शरद शिंदे व्यक्तींचे नाममात्र महसुल अभिलेखात नावावर असल्याचा गैरफायदा घेवून ते प्लॉटींग करुन विक्री करण्याच्या प्रयत्नात असल्यामुळे त्यांना दाव्यात समावेष्ट करुन त्यांनी सदर मिळकत कोणाही व्यक्तीस, संस्था अथवा बैंक इत्यादीना विक्रीकरु नये म्हणुन मनाई हुकुमचा अर्ज मा. न्यायालयात दिलेला आहे. परंतु वरील लोक हे सदर मिळकत दावा मा. न्यायालयात प्रलंबीत असताना बेकायदेशीररित्या विक्री करत आहेत तशी त्यांची विविध लोकांशी बोलणी व ठराव देखील चालू आहे.

सर्व जनतेस नम्नपुर्वक कळविण्यात येते की, त्यामुळे उपरोक्त वर्णनाच्या मिळकतीविषयी कोणत्याही व्यक्ती अथवा संस्थेने म. अब्दुल रऊफ जब्बारखान पठाण, अदिल शहानुर कुरेशी व मिरा शरद शिंदे यांचे बरोबर खरेदी, विक्री, इसारपावती, बक्षिसपत्र, दानपत्र, वाटणीपत्र, संमतीपत्र, मृत्युपत्र, व इतर कोणत्याही प्रकारचा करार अथवा व्यवहार करू नये नसता संभाव्य होणाऱ्या खर्च व संपुर्ण परिणामांची संपूर्ण जबाबदारी करार/खरेदी करणाऱ्या व्यक्तीवर राहिल तसेच त्यास पोलीस, दिवाणी व फौजदारी कार्यवाही सामोरे जावे लागेल.

दिनांक : २३/०३/२०२६

मार्फत :
**अॅड.टी.एन. कोल्हे**
जिल्हा व सत्र न्यायालय, माजलगाव
ऑफीस रेणापुरी, ता. माजलगाव जि. बीड
मो.नं. ९४२३१४३८४८

जाहीर प्रगटन देणार
**विठ्ठल रामभाऊ वरवडे**
रा. काळा हनुमान नगर,
वडवणी ता. वडवणी जि.बीड

# क्लासेसमधील गर्दीत विद्यार्थ्यांचे भवितव्य हरवू देऊ नका-माजी प्राचार्य विठ्ठल काळे

बीड (प्रतिनिधी): आजच्या स्पर्धात्मक युगात मोठ्या शहरांमध्ये एकाच वर्गात १५०० पर्यंत विद्यार्थी बसवले जातात. अशा अफाट गर्दीत प्रत्येक विद्यार्थ्याकडे वैयक्तिक लक्ष देणे शक्य होत नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांची खरी प्रगती होत आहे का, याचा पालकांनी गांभीर्याने विचार करणे आवश्यक आहे. केवळ गर्दीचा भाग बनून विद्यार्थ्यांचे भवितव्य हरवू देऊ नका, असे परखड प्रतिपादन स्वा. सावरकर कनिष्ठ महाविद्यालय, बीडचे माजी प्राचार्य विठ्ठल काळे यांनी केले. अचिव्हर्स अकॅडमी, बीड यांच्या वतीने आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार, बक्षीस वितरण व करिअर मार्गदर्शन या कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देवगिरी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य मा. प्रदीप गाडे (माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, जवळा-म्हाळस), मा. भारत मगर (मुख्याध्यापक, भीमसिंह विद्यालय, मातोरी) आणि मा. भीमराव मिसाळ (शालेय समितीचे अध्यक्ष, खोकरमोहा), मा.के. डी. राऊत, अचिव्हर्स अकॅडमीचे संचालक प्रा.अर्जुन राठोड, नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य डी.डी.राऊत उपस्थित होते.

पुढे बोलताना विठ्ठल काळे यांनी विद्यार्थ्यांच्या करिअरला योग्य दिशा देण्यासाठी प्रा. प्रदीप रोडे व त्यांच्या टीमने उचललेले पाऊल धाडसी असल्याचे नमूद केले. केवळ ५० ते १०० विद्यार्थ्यांच्या मर्यादित बॅचेस आणि तज्ज्ञ प्राध्यापकांचा थेट संवाद यामुळे विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेत निश्चितच वाढ होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात प्रा. प्रदीप रोडे यांनी विद्यार्थ्यांच्या घडणीत पालकांची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. चुकीचा मित्रपरिवार आणि मोबाईलचा अतिरेक हे विद्यार्थ्यांच्या प्रगतीतील प्रमुख अडथळे असल्याचे त्यांनी नमूद केले. जिथे शिस्त आहे, तिथेच यश आहे, असे स्पष्ट करत त्यांनी विद्यार्थ्यांना सातत्यपूर्ण प्रयत्न करण्याचे आवाहन केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर राहावे, हीच संस्थेची भूमिका असल्याचे त्यांनी सांगितले.

प्रस्तावनेत प्रा.अर्जुन राठोड यांनी अकॅडमीतील अत्याधुनिक सुविधा, मजबूत पायाभूत सुविधा आणि अनुभवी फॅकल्टीबाबत सविस्तर माहिती दिली. तुमची मेहनत हेच आमचे खरे यश आहे, असे सांगत त्यांनी विद्यार्थ्यांना प्रामाणिक प्रयत्न करण्याचे आवाहन केले.

यानंतर अचिव्हर्स अकॅडमीच्या वतीने जानेवारी २०२६ मध्ये इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी घेण्यात आलेल्या 'एन्ट्रन्स टेस्ट'मधील प्रत्येक विद्यालयातील टॉप टेन गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार व बक्षीस वितरण करण्यात आले.

कार्यक्रमाला प्रा. संजय खाडे, प्रा. के. एल. मीना, प्रा. अमरजित चौधरी, प्रा. बबिता मॅडम, माधुरी घुमरे मॅडम यांच्यासह विद्यार्थी, पालक व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. किशोर वाघमारे यांनी तर आभार डॉ. विकास वाघमारे यांनी मानले.

# बीडच्या रुग्णाला मुंबईत मिळालं नवजीवन

- जसलोकच्या तज्ज्ञ उपचारांनी पुन्हा चालता झाला
- जसलोक हॉस्पिटलची जटिल स्पाइन सर्जरी ठरली जीवनदायी
- १५ दिवस अनिश्चिततेत गेलेल्या रुग्णाला 'एका हलक्या हालचालीने' दिली आशा;

***बीड दि.२२ (प्रतिनिधी) : मुंबई, २२ मार्च २०२६: बीड जिल्ह्यातील श्री. राजीव वरवडे यांच्यासाठी एका भीषण अपघातानंतर जीवन जणू थांबलं होतं. मानेच्या गंभीर दुखापतीमुळे त्यांच्या संपूर्ण शरीराला अर्धांगवायू झाला होता. मात्र, मुंबईतील जसलोक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर येथे करण्यात आलेल्या अत्यंत गुंतागुंतीच्या स्पाइन सर्जरीमुळे त्यांना नवजीवन मिळालं असून, आज ते स्वतःच्या पायावर चालत आहेत.***

श्री.वरवडे हे कामावरून घरी परतत असताना झालेल्या अपघातात त्यांच्या मानेच्या मणक्याला फ्रॅक्चर झाले. या दुखापतीमुळे पाठीच्या कण्यावर प्रचंड दबाव आला आणि त्यांच्या खांद्याखालचा संपूर्ण भाग निकामी झाला. स्थानिक पातळीवर अनेक रुग्णालयांनी ही दुखापत अत्यंत गंभीर असल्याचे सांगत उपचार करण्यास नकार दिला. पुढील १५ दिवस ते कोणत्याही ठोस उपचारांशिवाय घरीच होते, ज्यामुळे त्यांच्या प्रकृतीत अधिक बिघाड झाला.

या कठीण काळात त्यांच्या कुटुंबीयांनी मुंबईतील जसलोक हॉस्पिटलशी संपर्क साधला. तेथे कन्सल्टंट स्पाइन सर्जन डॉ. मनिष कोठारी यांनी व्हिडिओ कन्सल्टेशनद्वारे तपासणी केली. या तपासणीत शरीर पूर्णतः निष्क्रिय असतानाही डाव्या पायाच्या अंगठ्यात झालेली अतिशय सूक्ष्म हालचाल त्यांनी ओळखली. हीच एक आशेची किरण ठरली.

यानंतर श्री. वरवडे यांना तातडीने मुंबईत दाखल करण्यात आले. उपचारांमधील विलंबामुळे शस्त्रक्रिया अत्यंत जोखमीची होती-रुग्णाला आयुष्यभर व्हेंटिलेटरवर राहावे लागू शकते, अशी शक्यता होती. तरीही, कुटुंबियांनी धाडसाने शस्त्रक्रियेचा निर्णय घेतला. डॉ. कोठारी आणि त्यांच्या टीमने सर्व्हायकल स्पाइन सर्जरी करून पाठीच्या कण्यावरील दबाव कमी केला आणि मणक्याला स्थिरता दिली. शस्त्रक्रियेनंतर सकारात्मक बदल दिसू लागले. अवघ्या दोन आठवड्यांत श्री. वरवडे आधाराने चालू लागले आणि तीन महिन्यांत ते पूर्णपणे स्वतः चालण्यास सक्षम झाले.डॉ. मनिष कोठारी म्हणाले, या केसमध्ये सर्वात मोठे आव्हान म्हणजे शस्त्रक्रिया यशस्वी झाली तरी रुग्ण व्हेंटिलेटरवर अवलंबून राहण्याची शक्यता होती. मात्र, आम्ही त्यांना स्वतंत्रपणे श्वास घेता यावा आणि सामान्य आयुष्य जगता यावे, यावर लक्ष केंद्रित केले.जसलोक हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटरचे चीफ मेडिकल ऑफिसर डॉ. मिलिंद खडके यांनी सांगितले, बीडसारख्या भागातील रुग्णांना अत्याधुनिक उपचारांची गरज असते. अशा वेळी टर्शियरी केअर सेंटर्सनी पुढे येऊन जबाबदारी स्वीकारणे महत्त्वाचे असते. ही केस आमच्या बहुविद्याशाखीय दृष्टिकोनाचे उदाहरण आहे.स्वतःच्या अनुभवाबद्दल बोलताना श्री. राजीव वरवडे म्हणाले, अपघातानंतर सर्व काही संपल्यासारखं वाटत होतं. पण जसलोक हॉस्पिटलमध्ये उपचार मिळाले आणि आज मी पुन्हा चालू शकतोय-हे माझ्यासाठी नवजीवनच आहे. ही केस केवळ एका रुग्णाच्या पुनर्जन्माची कहाणी नसून, बीडसारख्या जिल्ह्यातील रुग्णांनी योग्य वेळी तज्ज्ञ उपचार मिळविल्यास अशक्य वाटणाऱ्या परिस्थितीतही आशा निर्माण होऊ शकते.

# पार्श्वभूमी

दि.२३ मार्च २०२६ सोमवार

पान ६


## सखाराम भंडारे यांचे निधन



बीड दि.२२ (प्रतिनिधी):- बीड येथील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेतील सेवानिवृत्त कर्मचारी सखाराम राणूजी भंडारे यांचे वयाच्या ८७व्या वर्षी अल्पशा आजाराने दि. २२ मार्च २०२६ रोजी दुपारी १ वाजता मुंबई येथे एका खाजगी रुग्णालयात दुःखद निधन झाले. दिवंगत सखाराम भंडारे यांच्या पार्थिवावर सोमवार दि. २३ मार्च सकाळी ९ वाजता भगवानबाबा पान २ वर

## हर्षवर्धन सदगीर ठरला महाराष्ट्र केसरीचा विजेता


पुणे :पुण्यातील वाघोळी येथे ६८व्या महाराष्ट्र केसरीचा अंतिम सामना खेळवला गेला. स्पर्धेचा अंतिम सामना हर्षवर्धन सदगीर आणि बाहुबली ओळख मिळवलेल्या महेंद्र गायकवाड यांच्यात खेळवण्यात आला. हर्षवर्धन सदगीरने महेंद्र गायकवाडवर ३ गुणांनी विजय मिळवला. या विजयासह नाशिकचा कुस्तीपटू हर्षवर्धन सदगीर दुसऱ्यांदा विजेता ठरला. यासह डबल महाराष्ट्र केसरी होण्याचा पान २ वर

## ६८ लाखांची जलजीवन मिशन योजना कागदावरच?

### रुईगव्हाणमध्ये पाण्यासाठी ग्रामस्थांची धडपड

**बीड (प्रतिनिधी) :– केंद्र सरकारच्या जलजीवन मिशन योजनेअंतर्गत बीड जिल्ह्यातील रुईगव्हाण गावासाठी सुमारे ६८.०२ लाखांचा पाणीपुरवठा प्रकल्प मंजूर करण्यात आला. या योजनेचा उद्देश गावातील प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे स्वच्छ पाणी पोहोचवण्याचा होता. मात्र प्रत्यक्ष परिस्थिती पाहता ही योजना केवळ कागदावरच असल्याचा प्रश्न ग्रामस्थांमध्ये उपस्थित होत आहे. गावात उभारण्यात आलेली पाण्याची उंच टाकी सध्या पूर्णपणे कोरडी असून तिची देखभालही योग्य पद्धतीने होत नसल्याचे दिसून येते. टाकीचे झाकण तुटलेले असून परिसराचीही दुरवस्था झाली आहे. त्यामुळे या योजनेची अंमलबजावणी नेमकी कितपत झाली,याबाबत ग्रामस्थांमध्ये नाराजी व्यक्त केली जात आहे.**






या प्रकल्पांतर्गत गावातील २७३ घरांना नळ जोडणी देण्याचे लक्ष्य निश्चित करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात अनेक घरांपर्यंत अजूनही नळजोडणी पोहोचलेली नाही, असे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. त्यामुळे मोठा निधी खर्च झाल्याचे दाखवले जात असताना प्रत्यक्षात काम पूर्ण झाले आहे का, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.दरम्यान, या संपूर्ण प्रकरणाची सविस्तर माहिती मिळावी यासाठी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत संबंधित विभागाकडे माहिती मागविण्यात आली असल्याची माहिती स्वप्निल संजय काशीद यांनी दिली. गावकऱ्यांच्या मते, प्रशासनाने या प्रकरणाची तातडीने चौकशी करून प्रत्यक्ष पाहणी करावी आणि कामात हलगर्जीपणा झाल्यास संबंधित अधिकारी व कंत्राटदारांवर योग्य ती कारवाई करावी. अशी मागणीही ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. दरम्यान, या प्रकरणी जलजीवन अंतर्गत पाणीपुरवठा योजनेच्या कामाची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी,अशी तक्रार स्वप्नील संजय काशीद यांनी जिल्हापरीषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे दिली आहे. आता यामध्ये प्रशासन काय कारवाई करते? याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## आ.सुरेश धस यांच्यामुळे रोहयोतील 'एफटीओ'चा प्रश्न लागला धसास

### शेतकऱ्यांना मिळाला मोठा दिलासा

पाटोदा दि.२२(महेश बेदरे):- आष्टी, पाटोदा आणि शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांच्या रोहयो (रोजगार हमी योजना) अंतर्गत कामांबाबत निर्माण झालेल्या 'एफटीओ' (Fund Transfer Order) संदर्भातील समस्येवर अखेर तोडगा निघाला असून, आमदार सुरेश धस यांच्या पाठपुराव्याला यश आले आहे. संबंधित जुन्या कामांचे एफटीओ डिलीट करण्याचा निर्णय शासन पातळीवर घेण्यात आला असल्याची माहिती पुढे आली आहे.

एफटीओ म्हणजे काय? (Fund Transfer Order): 'एफटीओ' म्हणजे निधी हस्तांतरण आदेश. रोहयो अंतर्गत मंजूर कामांवरील मजुरी किंवा खर्चाची रक्कम संबंधितलाभार्थ्यांच्या



पान २ वर

**शासनाचा निर्णय आणि दिलासा :**

**शासनाच्या या निर्णयामुळे अडकलेली देयके मार्गी लागण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. संबंधित सर्व एफटीओ डिलीट करण्यात आल्याने आता नव्याने प्रक्रिया सुरू करून शेतकऱ्यांना त्यांचे हक्काचे पैसे मिळण्याची शक्यता वाढली आहे.**

**समस्या नेमकी काय होती?**

**तालुक्यातील अनेक शेतकऱ्यांनी जलसिंचन विहिरी, शेततळे,गायगोठे,रस्ते मजबुतीकरण आदी कामे रोहयो अंतर्गत पूर्ण केली होती.मात्र,काही तांत्रिक व प्रशासकीय कारणांमुळे या कामांचे एफटीओ प्रलंबित राहिले किंवा अडकले होते. परिणामी शेकडो शेतकरी यांना त्यांच्या श्रमाचे मोबदले वेळेवर मिळाले नाहीत.**

**शेतकऱ्यांना आवाहन :**

**या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांनी कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये, तसेच कोणत्याही आमिषाला बळी पडू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. काही अडचणी असल्यास संबंधित गणप्रमुख किंवा स्थानिक प्रशासनाशी संपर्क साधावा, असेही आवाहन आ.सुरेश धस यांच्या वतीने करण्यात आले आहे.**

## लवूळ ग्रामपंचायतीचा मनमानी कारभार

### अनेक ग्रामसभा जनतेच्या प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष

**लवुळ दि.२२(प्रतिनिधी):– माजलगाव व वडवणी तालुका लाभलेल्या लवूळ गावाला गेल्या काही महिन्यापासून गाव विकासासाठी शासनाच्या नियमानुसार ग्रामसभा अर्धवट अवस्थेत होऊन जनतेच्या प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून काही ग्रामसभा या कागदावरच होत असल्यामुळे सामान्य जनतेकडे लक्ष देण्यास येथील ग्रामपंचायत असमर्थ ठरत असल्याची चर्चा जनतेत होत आहे. काही ठिकाणी पंधराव्या आयोगांमधून मध्यंतरी काही कामे प्रभाग मध्ये करण्यात आले मात्र हे काम अत्यंत निकृष्ट पद्धतीचे झालेले असून हा रस्ता गजानन विद्यालयाच्या पाठीमागील असून यावर किती बजेट आणि रस्ता किती झाला? हे मात्र कळण्यास तयार नाही.**

मध्यंतरी जिल्हापरिषद शाळेच्या पाठीमागील बाजूला स्वच्छ भारत मिशन सन २०२४/२५ सार्वजनिक शौचालय बांधकाम करण्यात आले पण याचा उपयोग सामान्य जनतेला काहीच होत नाही कारण ही जागा कुठे आहे? आजही शौचालय म्हणून ओळखताच येत नाही. या शौचालयाचे काम मध्यंतरी दोन दरवाजे बसविण्यात आले मात्र काही कामे अजूनही अत्यंत निकृष्ट पद्धतीचे असून याची चौकशी होणे गरजेचे आहे. या शौचालयाचे इतर वापरलेले मटेरियल अत्यंत खराब आहे पण याकडे येथील ग्रामसेवक जाणूनबुजून लक्ष देण्यास तयार नाही, असे जनतेतून बोलले जात आहे. मध्यंतरी शासनाच्या नियमानुसार ग्रामसभा होणे गरजेचे आहे पण येथील ग्रामपंचायत ग्रामसभा अर्धवट अवस्थेतच घेऊन कागदावरच जनतेच्या प्रश्नाकडे पूर्णपणे दुर्लक्ष करून आपला कारभार चालवीत आहे. यामुळे जनतेत मोठ्या प्रमाणात संताप व्यक्त होत आहे. ग्रामरोजगारसेवक हे सुद्धा पद ग्रामपंचायतीच्या मनमानी कारभारामुळे रिक्त असून ही जागा तात्काळ भरणे गरजेचे आहे पण याकडेही दुर्लक्ष होत असताना दिसत आहे. काही प्रभागमध्ये थातूरमातूर रस्त्याचे, नाल्याचे व इतर कोणतेही कामे होत असेल तर त्यावर आवाज उठविणे हे जनतेचे काम आहे पण याला सुद्धा ग्रामपंचायतीकडून दाद दिली जात नाही, असे जनतेचे म्हणणे आहे. गेल्या अनेक वर्षापासून गावातील सहा ते सात लाखांचे फिल्टरचे पाणी प्लांट अजून सुद्धा धुळखात पडून पान २ वर

## चकलांबा येथील रोकडेश्वर मंदिरात परंपरेनुसार धर्मध्वज उभारला





रोकडे परिवारातील सदस्य आणि इतर प्रतिष्ठित मान्यवर परंपरेनुसार ध्वज लावण्याचे

बीड दि. २२ (प्रतिनिधी):-गेवराई तालुक्यातील चकलांबा येथील भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या श्री रोकडेश्वर मंदिरात प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर नवीन भगवी पताका, धर्मध्वज विधिवत मिरवणूकीनंतर भाविकांच्या उपस्थितीत लावण्यात आला.

नवीन वर्षाच्या प्रारंभी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर ध्वज उभारण्याची परंपरा आहे. स्वाध्याय मिरवणूक काढून विधिवत पूजा करून रोकडेश्वर मंदिरातील बुरुजावर ध्वज उभारण्यात येतो. परंपरागत मान असलेले चकलांबा गावातील पान २ वर

## आज माजलगावात हिंदू एकता व्याख्यान मालेचे आयोजन

माजलगाव दि.२२(प्रतिनिधी):- राम नवमी निमित्त श्रीराम नवमी उत्सव समिती, माजलगाव यांच्या वतीने यंदा धार्मिक, सामाजिक व जनजागृतीपर विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून शहरात उत्सवाचे वातावरण निर्माण झाले आहे. समितीच्या वतीने आयोजित कार्यक्रमांमध्ये हिंदू एकता व्याख्यानमाला, रक्तदान शिबिर व भव्य मोटारसायकल रॅलीचा समावेश आहे.

उत्सवाची सुरुवात दिनांक २३ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे आयोजित 'हिंदू एकता व्याख्यानमाला' या कार्यक्रमाने होणार आहे. पान २ वर

## ईद मुबारक....



बीड - रमजान ईद निमित्त नगरसेवक महेश धांडे यांनी समाज सेवक मुसा खान पठाण यांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी मुसा खान यांनी महेश धांडे व पप्पू आगे यांचा सत्कार केला. यावेळी अरबाज खान, ईमरान खान, अबरार खान ,अजमत खान. शेख आमेर, जीशान बेग आदी.

## पत्रकार अमोल मुळे यांना महाराष्ट्र शासनाचा राष्ट्रपिता महात्मा गांधी पुरस्कार जाहीर



बीड दि २२ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाच्या वतीने देण्यात येणारा 'राष्ट्रपिता महात्मा गांधी' पुरस्कार दै. दिव्य मराठीचे ब्यूरो चीफ अमोल मुळे यांना जाहीर झाला. राज्याच्या सामाजिक न्याय विभागाच्या वतीने व्यसनमुक्ती बाबत केलेल्या लिखाणासाठी दरवर्षी राज्यातील एका पत्रकारास हा पुरस्कार देण्यात येतो. सन २०२४-२५ या सालासाठीचा पुरस्कार अमोल मुळे यांना जाहीर झाला आहे. रोख रक्कम, पान २ वर

## सर्व संकटात रक्षण करणारा महामंत्र 'रामरक्षा स्तोत्र' -श्री श्री शंकर भारती महास्वामी

बीड (प्रतिनिधी):- प्रभू श्रीरामाचे वर्णन आणि रक्षण करणारा महामंत्राचे बुधकौशिक ऋषींनी केलेल्या या रचनेचे स्मरण केले तरी संकटातून मार्ग मिळतो, हे स्तोत्र मुखोद्गत असावे तरच त्याचे योग्य वेळी स्मरण होईल, अशा संदेशात्मक उपदेश श्री श्री शंकर भारती महास्वामींनी आज 'श्रीरामरक्षा पठण सामूहिक



कार्यक्रम' प्रसंगी सांगितला, यावेळी उपस्थित विद्यार्थी, बाल वयातील मुलामुलींचे त्यांनी भरभरून कौतुक केले.

जीवनाच्या प्रवासात कोणत्याही कर्तव्यात अडसर ,संकटे येत असतात. प्रवासात अपघात होऊ नये ,बिघाड, हिंस्त्रप्राणी हल्ले होतात. तसेच विद्यार्थ्यांना शिक्षणात समस्या येतात. आपल्या शरीरात डोक्यापासून सर्व अवयवाचे रक्षण व्हावे. नोकरी व्यवसायात व्यत्यय पान २ वर

## गेवराई तरुणावर टोळक्याचा प्राण घातक हल्ला



बीड दि २२ (प्रतिनिधी) - गेवराई शहरात किरकोळ कारणावरून एका तरुणावर १५ ते २० जणांच्या टोळक्याने प्राणघातक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात तरुण गंभीर जखमी झाला असून त्याची प्रकृती चिंताजनक आहे. या घटनेनंतरही आरोपींवर तात्काळ कारवाई न झाल्याने पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २० मार्च रोजी सायंकाळी सुमारे सहा वाजण्याच्या सुमारास शेख अरबाज शेख जब्बार (रा. तय्यब गल्ली, गेवराई) हा तरुण उपास सोडण्यासाठी साहित्य खरेदी करण्यासाठी दुचाकीवरून कुटुंबासोबत घराबाहेर पडला होता. त्यावेळी त्याच्यासोबत त्याची पत्नी आणि एक वर्षाचा मुलगा देखील होता.दरम्यान, गेवराईतील राजगल्ली परिसरात किरकोळ कारणावरून वाद निर्माण झाला आणि अचानक १५ ते २० जणांच्या टोळक्याने लोखंडी रॉड, लाथा-बुक्क्यांनी त्याच्यावर हल्ला चढवला. या बेदम मारहाणीत त्याच्या छातीला गंभीर दुखापत झाली असून बरगड्या मोडल्या आहेत. तसेच डोक्याला गंभीर मार लागून १३ टाके घालावे लागले आहेत.जखमी अवस्थेत त्याला प्रथम गेवराई येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले. पान २ वर

## गंभीर गुन्ह्यातील आरोपी महिन्यापासून फरार बीड शहर पोलिसांच्या कारभारावर प्रश्नचिन्ह

### बीड शहर पोलीस ठाण्या पासून २०० मीटरवरचा आरोपी पोलिसांना सापडत नाही?

बीड (प्रतिनिधी):-बीड जिल्ह्यात मागील काही महिन्यांपासून वाढत चाललेल्या गुंडगिरीमुळे कायदा व सुव्यवस्थेबाबत गंभीर प्रश्न उपस्थित होत आहेत. सार्वजनिक ठिकाणी मारहाण, शस्त्रांनी हल्ले आणि जिवे मारण्याच्या धमक्या अशा घटना सातत्याने घडत असून, गुन्हेगारांमध्ये पोलिसांचा धाक उरला नसल्याचे चित्र दिसत आहे.

अशातच, बीड शहर पोलीस ठाण्याच्या हद्दीत गंभीर गुन्हा दाखल असतानाही संबंधित आरोपी मागील एक महिन्यापासून फरार असल्याची बाब समोर आली आहे. विशेष म्हणजे, तो खुलेआम फिरत असल्याची चर्चा स्थानिकांमध्ये असून, यामुळे पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. कबाडगल्ली येथील रहिवासी छाया गजानन शिंदे यांनी पोलीस अधीक्षकांकडे दिलेल्या तक्रारीनुसार, २० फेब्रुवारी २०२६ रोजी मध्यरात्री १ ते २ वाजण्याच्या सुमारास काही आरोपींनी त्यांच्या मुलावर लोखंडी रॉडने हल्ला करून गंभीर जखमी केले. या घटनेत मध्यस्थी मारहाण करण्यात करण्यात आली. या प्रकरणी बीड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५५/२०२६ नोंदविण्यात आला आहे. तक्रारीनुसार, शंकर लक्ष्मण कुरुळे, गोरख उर्फ पिंटू लक्ष्मण कुरुळे, विकी उर्फ सोनू मुळे आणि कृष्णा शंकर कुरुळे (सर्व रा.कबाडगल्ली, बीड) हे आरोपी तक्रारदार शिंदे कुटुंबाला वारंवार जिवे मारण्याच्या धमक्या देत आहेत. प्रकरण मिटवून टाका, अन्यथा गंभीर परिणाम भोगावे लागतील, पान २ वर

## शिरूर शहराच्या पाणीपुरवठा योजनेला पालखी मार्गाचा गतिरोधक

### न्याय मागण्यांसाठी महिला पदाधिकाऱ्यांचा आंदोलनाचा इशारा

### हद्दीच्या लपंडावात चार वर्षापासून शिरूर वासियांचा घसा कोरडा



शिरुर कासार (प्रतिक भांडेकर):- शिरुर शहरातून मार्गस्थ होणार्या पैठण- पंढरपूर पालखी मार्गाचे काम प्रगतीपथावर आहे. मार्ग प्रशासनाला शहर विस्तारी कणाचा विसर पडल्याने ग्रामीण प्रमाणेच शहरातून निमुळत्या हद्दीत कन्स्ट्रक्शनचे काम सुरू आहे. प्रगतीपथावरील पाणीपुरवठा योजनेच्या जलवाहिनीच्या कामास अडथळा निर्माण होणार असल्याने नगरपंचायतच्या बांधकाम सभापती सुनिता अक्षय रणखांब यांनी न्यायिक मागण्यांसाठी आंदोलनाचा इशारा दिला आहे.शिरुर शहरातून मार्गस्थ होणार्या राजूरी (नवगन)- चिंचपूर राज्य मार्ग क्रमांक ५९ व पैठण-पंढरपूर पालखीमार्ग प्राथमिक आरोग्य केंद्र (वारणी ग्रामपंचायत हद्द) ते जिजामाता चौक, पाटबंधारे कॅनल अंतर किमान ६०० मिटर हद्दीतून एकत्रित मार्गस्थ होत आहेत. पालखी मार्गाची ग्रामीण २० मिटरची हद्द कायम आहे. त्यानुसार शहरी भागासाठी हद्द निश्चित अधिक असणे अनिवार्य असताना पालखी मार्ग प्रशासनाने केवळ नाल्यांसाठी पान २ वर